सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्षे - ३ रे ❏ अंक - १६४ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ गुरुवार दि. २४ जुलै २०२५ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६

## दिल्लीत आरएसएस संघचालक मोहन भागवत यांची मुस्लीम धर्मगुरू इमाम यांच्यासोबत महत्त्वाची बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नवी दिल्ली**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत दिल्लीतील हरियाणा भवन येथे एक बैठक घेत आहेत. या बैठकीबाबत राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. कारण ही बैठक मुस्लीम धर्मातील नेत्यांसोबत होत आहे. या बैठकीला ऑल इंडिया इमाम संघटनेचे प्रमुख उमर अहमद इलियासीसह मुस्लीमांचे अनेक धर्मगुरू सहभागी होणार आहेत. त्याशिवाय संघाचे ज्येष्ठ नेते दत्तात्रय होसाबळे, कृष्ण गोपाळ, रामलाल आणि इंद्रेश कुमारही बैठकीत हजर असणार आहेत.

एका रिपोर्टनुसार, ही बैठक संघाच्या मुस्लीम समाजापासून संवाद वाढवण्याच्या प्रयत्नांचा एक भाग मानली जाते. आरएसएसशी निगडीत मुस्लीम राष्ट्रीय मंचाकडून सातत्याने मुस्लिम समाजातील अभ्यासक, धर्मगुरू आणि इतर प्रतिष्ठित चेहऱ्यांसोबत संवाद वाढवला जात आहे. २०२३ मध्ये या मंचाकडून एक राष्ट्र, एक ध्वज, एक राष्ट्रगीत या भावनेतून अल्पसंख्याक समुदायाशी संवाद साधण्यासाठी राष्ट्रव्यापी अभियान सुरू करण्याची घोषणा केली होती. याआधी सप्टेंबर २०२२ मध्येही मोहन भागवत यांनी मुस्लीम



समाजातील लोकांसोबत चर्चा केली होती.

ऑक्टोबर २०२२ मध्ये संघाचे नेते इंद्रेश कुमार यांनी दिल्लीतील हजरत निजामुद्दीन दर्ग्याला भेट दिली होती. तिथे दर्गा परिसरात दिवे पेटवण्यात आले होते. त्यावेळी ते म्हणाले होते की, कुणीही जबरदस्तीने धर्म परिवर्तन अथवा हिंसाचार करू नये. सर्वांना आपापल्या धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य आहे आणि सर्वांनी धर्मांचा सन्मान ठेवणे गरजेचे आहे असं त्यांनी सांगितले होते. इतकेच नाही तर सप्टेंबर २०२२ मध्ये मोहन भागवत यांनीही ऑल इंडिया इमाम संघटनेचे प्रमुख उमर अहमद इलियासी यांची भेट घेतली होती. त्याचवेळी एका मशिदीचा आणि मदरशाचा दौरा त्यांनी केला होता. या सर्व प्रयत्नांना धार्मिक सुसंवादासाठी उचललेले पाऊल मानले जात होते.

दरम्यान, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ त्यांच्या स्थापनेचा शताब्दी वर्ष साजरे करत आहे. ज्या अंतर्गत ते भारतातील प्रत्येक गावात, शहरात, घराघरात पोहचण्याचा प्रयत्न करत आहेत. आज दिल्लीतील हरियाणा भवन इथं संघाचे सरसंघचालक मोहन भागवत मुस्लीम धर्मगुरूंसोबत बैठक घेत आहेत. विविध समुदायांमध्ये संवाद वाढवणे आणि सामाजिक एकता मजबूत करणे हा त्यामागचा उद्देश आहे. शताब्दी वर्षात देशातील प्रत्येक भागात आपली विचारधारा आणि सेवा कार्य पसरवण्याचा प्रयत्न संघ करत आहे. ही बैठक याच दृष्टीने महत्त्वाची मानली जाते जिथे विविध धर्मातील लोकांसोबत सुसंवाद साधण्याचा, सहकार्य करण्याचा भाग आहे.

## निवृत्त पोलिस अधिकाऱ्यांच्या 'जिंदगी के बाद'चीही काळजी!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४मुंबई**

पोलिस अधिकाऱ्यांचे पगार, सुविधांचा दर्जा, निवासस्थानांची दुरवस्था यावर बरेचदा लिहिले जाते. संघटनांचा अधिकार नसलेला हा वर्ग सरकारवर दबावही आणू शकत नाही. अडचणी असल्या तरी कर्तव्य पार पाडत निवृत्त झालेल्या पोलिस अधिकाऱ्यांच्या नशिबी मृत्यूनंतर मात्र आता सन्मान येणार आहे.



'जिंदगी के साथ भी'बाबत पोलिसांचा खात्याविषयी अनुभव किती चांगला असतो हा विषय अलाहिदा पण 'जिंदगी के बाद' आमच्या संवेदना तुमच्या आणि तुमच्या कुटुंबासोबत असतील असा संदेश देणारी एक कार्यपद्धती (एसओपी) पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी निश्चित केली आहे. निवृत्त अधिकाऱ्यांवर सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार, कुटुंबाला भावनिक आधार देणे यावर आधारित ही कार्यपद्धती आहे. अंत्यसंस्कारासाठी हार, फुलांसाठी २ हजार रुपये हे युनिट कल्याण निधीतून कुटुंबाला लगेच दिले जातील. वाहन/एस्कॉर्टची व्यवस्थाही करण्यात येईल.

पोलिस महासंचालक दर्जाच्या निवृत्त अधिकाऱ्याच्या अंत्यसंस्कारावेळी 'गार्ड ऑफ ऑनर' दिला जाईल. शोकसलामी दिली जाईल. कोणत्या दर्जाच्या निवृत्त अधिकाऱ्याच्या अंत्यसंस्काराचे नियोजन कुटुंबाच्या मदतीने कोणत्या पदावरील अधिकाऱ्याने करावे हेही निश्चित करण्यात आले आहे. हे अधिकारी प्रतिनिधी अंत्यसंस्कारानंतर निधन झालेल्या अधिकाऱ्याच्या कुटंबाची भेट घेतील आणि वरिष्ठांचा लेखी शोकसंदेश त्यांना देतील.

## इजा, बिजा झाला, तिजाची वेळ आणू नका अजितदादांनी माणिकराव कोकाटेंना दिला होता इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४मुंबई**

विधानसभेच्या सभागृहात कृषिमंत्री माणिकराव कोकाटे रमी खेळतानाचा व्हिडिओ समोर आला. त्याबाबत हा परिसर सभापती राम शिंदे आणि अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या अख्यारित आहे. ते या प्रकरणाची चौकशी करत आहेत. माझी सोमवारी किंवा मंगळवारी कृषिमंत्री कोकाटेंसोबत भेट होईल. त्यानंतर पुढचा निर्णय घेऊ अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोकाटे यांच्या राजीनाम्यावर भाष्य केले आहे.



पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना अजित पवार म्हणाले की, मी कोकाटे यांचा खुलासा ऐकला, मी खेळत नव्हतो असं ते बोलले. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात सरकार आल्यानंतर आम्ही प्रत्येक मंत्र्यांशी चर्चा केली होती. प्रत्येकाने भान ठेवून वागले पाहिजे अशा सूचना दिल्या होत्या. कोकाटेंबाबत मागेही असेच काही घडले तेव्हा त्यांनी मी समज दिली होती. दुसऱ्यांदा घडले तेव्हाही समज दिली. त्यावेळी इजा, बिजा झाला तिजाची वेळ आणू नका असं सांगितले होते. आता सोमवारी किंवा मंगळवारी आमची भेट होईल. समोरासमोर त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर पुढचा काय असेल तो निर्णय घेऊ असं सांगत अजित पवारांनी कृषिमंत्र्यांच्या राजीनाम्यावर उत्तर दिले. तसेच कृषिमंत्री असो वा कुणीही मंत्री असो लोकांसमोर बोलताना तारतम्य ठेवून बोलले पाहिजे. स्वत:ला काही बंधने पाळून घेणार की नाही याचे भान ठेवले पाहिजे. सरकारमधील मंत्र्यांच्या वादावर मुख्यमंत्री आणि आम्ही दोन्ही उपमुख्यमंत्री याबाबत निर्णय घेऊ. महायुतीत काम करताना कुठल्याही नेत्याकडून, मंत्री-राज्यमंत्र्यांकडून सरकारला कमीपणा येईल अशी वागणूक होता कामा नये. हे तीन पक्षाचे सरकार आहे. कुणाकडून काही वाद झाले तर त्या त्या पक्षाची नैतिक जबाबदारी असते आणि राज्याचे प्रमुख म्हणून मुख्यमंत्री योग्य तो निर्णय घेऊ शकतात असंही अजित पवारांनी सांगितले.

दरम्यान, लातूरमधील मारहाणीच्या घटनेबाबत मला कळले तेव्हा मी ताबडतोब त्यावर ट्विट करून माझी भूमिका स्पष्ट केली. संबंधित पदाधिकाऱ्याला राजीनामा देण्याचे आदेश दिले. यशवंतराव चव्हाणांनी जी शिकवण आपल्याला दिली त्याला गालबोट लागता कामा नये. त्या दृष्टीने मी राजीनामा देण्याची सूचना केली आणि त्याने राजीनामा दिला आहे असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं.

## रशियन विमानाचा लँडिंगदरम्यान अपघात; सर्व ५० प्रवाशांचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २४ टिंडा**

चीनच्या सीमेलगत असलेल्या रशियाच्या पूर्वेकडील भागात ५० प्रवाशांना घेऊन जाणारे एक प्रवासी विमान कोसळले असून, सर्व प्रवासी मृत्युमुखी पडल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेची माहिती रॉयटर्स वृत्तसंस्थेने दिली आहे. हे विमान सोव्हिएत काळातील होते आणि जवळजवळ ५० वर्षे जुने होते. त्याच्या टेल क्रमांकावरून ते १९७६ मध्ये बांधले गेले होते असे दिसून येत आहे.



उड्डाणाच्या दरम्यानच विमान वाहतूक नियंत्रण कक्षाचा विमानाशी संपर्क तुटला आणि काही वेळातच बचाव पथकांना घटनास्थळी विमानाच्या जळालेल्या अवशेषांचे काही भाग आढळून आले. स्थानिक आपत्कालीन सेवा मंत्रालयाच्या माहितीनुसार, अंगारा एअरलाइन्सचे An-24 हे विमान अमूर प्रदेशातील टिंडा शहराजवळ पोहोचत असतानाच रडारवरून बेपत्ता झाले.

प्राथमिक विश्लेषणावरून असे दिसून येते की, कमी दृश्यमानतेमुळे लँडिंग करताना पायलटची चूक झाल्यामुळे हा विमान अपघात झाला असण्याची शक्यता आहे.

अंगारा एअरलाइन्सचे विमान चीनच्या सीमेवरील अमूर प्रदेशातील टिंडा शहराकडे जात होते परंतु ते रडार स्क्रीनवरून बेपत्ता झाले. रशियन वृत्तसंस्था इंटरफॅक्सनुसार, टिंडा विमानतळावर विमान उतरवण्याचा पहिला प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर, वैमानिकाने दुसऱ्यांदा प्रयत्न केला परंतु या दरम्यान एटीसीचा विमानाशी संपर्क तुटला.

या अपघाताबाबत बोलताना प्रादेशिक गव्हर्नर वसिली ऑर्लोव्ह म्हणाले की, प्राथमिक माहितीनुसार, विमानात पाच मुलांसह ४३ प्रवासी होते, ज्यात सहा क्रू मेंबर्स होते. विमानाचा शोध घेण्यासाठी सर्व आवश्यक सैन्य आणि संसाधने तैनात करण्यात आली आहेत.

## मुख्यमंत्री फडणवीस अनेक मंत्र्यांना नारळ देणार?

### संभाव्य यादीत शिंदेसेनेचे सर्वाधिक; भाजप, राष्ट्रवादीमधून ३ नावं

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४मुंबई**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीआधी मुख्यमंत्री त्याच्या मंत्रिमंडळातील अनेकांना बाहेरचा रस्ता दाखवण्याची शक्यता आहे. घोटाळांचे आरोप झालेल्या, वादग्रस्त विधानांमुळे अडचणीत आलेल्या मंत्र्यांना मुख्यमंत्र्यांकडून नारळ दिला जाईल अशी चर्चा आहे. नवं सरकार स्थापन होऊन सहा महिन्यांपेक्षा अधिकचा कालावधी झाला आहे. या कालावधीत अनेक मंत्री वादात सापडले आहेत. यात शिवसेनेच्या नेत्यांची संख्या सर्वाधिक आहे.

विधिमंडळाचं अधिवेशन सुरु असताना शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी कॅंटिनमधील कर्मचाऱ्याला मारहाण केली. त्यामुळे ते वादात सापडले. यानंतर सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट



बेडरुममध्ये सिगारेट ओढत असल्याचा व्हिडीओ समोर आला. त्यांच्याजवळ पैशांनी भरलेली बॅग दिसली. त्यामुळे शिरसाट वादग्रस्त ठरले. आपल्याला प्राप्तिकर खात्याची नोटिस आल्याची माहिती खुद्द संजय शिरसाट यांनीच दिली. गृहराज्यमंत्री असलेल्या योगेश कदम यांच्यावर मातोश्रींच्या मालकीच्या बारवर धाड पडली. तिथे बारबाला अश्लील नृत्य करताना आढळून आल्या. हे सगळे नेते शिवसेनेचे आहे.

मुख्यमंत्री काही अकार्यक्षम, वादग्रस्त मंत्र्यांना घरचा रस्ता दाखवू शकतात. यामध्ये शिवसेनेचे मंत्री संजय शिरसाट , संजय राठोड, भरत गोगावले, योगेश कदम यांचा नंबर लागू शकतो. या चौघांसोबतच राष्ट्रवादी काँग्रेसचे माणिकराव कोकाटे , नरहरी झिरवळ यांचंही मंत्रिपद जाऊ शकतं. विशेष म्हणजे भाजपचे संकटमोचक, मुख्यमंत्र्यांचे अतिशय जवळचे मंत्री गिरीश महाजन यांनाही पायउतार व्हावं लागू शकतं. जलसंपदा मंत्री असलेल्या महाजन यांच्याकडे संघटनेत महत्त्वाची जबाबदारी दिली जाऊ शकते. 'द न्यू इंडियन एक्स्प्रेस'नं याबद्दलचं वृत्त दिलं आहे.

## आरोपींना निर्दोष सोडण्याच्या हायकोर्टाच्या निर्णयाला सुप्रीम कोर्टाची स्थगिती

### आरोपी मात्र तुरुंगाबाहेरच राहणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४मुंबई**

२००६ साली मुंबईत झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व १२ आरोपींना निर्दोष ठरवण्याचा निकाल काही दिवसांपूर्वी मुंबई उच्च न्यायालयाने दिला होता. या निकालाला राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. राज्य सरकारच्या याचिकेवर आज सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाला स्थगिती दिली आहे. मात्र, असे करताना निर्दोष ठरल्यामुळे तुरुंगातून सोडलेल्या आरोपींना पुन्हा तुरुंगात जाण्याची आवश्यकता नसल्याचंही न्यायालयाने नमूद केलं. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालानंतर सोडलेले ११ आरोपी तुरुंगाबाहेरच राहणार असल्याचंही स्पष्ट झालं आहे.



सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्र सरकारच्या बाजूने युक्तिवाद सादर केला. न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश व न्यायमूर्ती एन. के. सिंह यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर आज सुनावणी झाली. उच्च न्यायालयाने सुटका केलेल्या आरोपींना लगेच पुन्हा तुरुंगात टाकलं जावं, अशी राज्य सरकारची मागणी नसल्याचं तुषार मेहता यांनी नमूद केलं.

सुटका झालेल्या आरोपींना न्यायालयाने पुन्हा तुरुंगात जाण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी आम्ही करत नाही आहोत. पण उच्च न्यायालयाने या प्रकरणात निकाल देताना मांडलेली काही निरीक्षणे मकोकाअंतर्गत चालू असलेल्या इतर प्रकरणांवर परिणाम करू शकतात. त्यामुळे या निकालाला स्थगिती दिली जावी, असं तुषार मेहता आपल्या युक्तिवादात म्हणाले.

## गॉगलद्वारे विठ्ठलाची विविध रूपे आता देशभरातील भाविकांना पाहता येणार; मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४पंढरपूर**

विठ्ठलाची महापूजा आणि विविध रूपे सर्वसामान्य भाविकांना पाहता यावीत यासाठी विठ्ठल मंदिरात व्हीआर दर्शन सुविधेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते बुधवारी झाला. गॉगलद्वारे देवाची विविध रूपे आता देशभरातील भाविकांना पाहायला मिळणार आहे. यापूर्वी उज्जैन आणि काशी विश्वेश्वर या देशातल्या दोन ठिकाणी अशा पद्धतीची सुविधा उपलब्ध आहे.



यावेळी मंदिर समितीच्यावतीने मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते मुख्यमंत्री फडणवीस यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. समाधान आवताडे, अभिजित पाटील, गोपीचंद पडळकर, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, मंदिर समितीचे सदस्य संभाजी शिंदे उपस्थित होते.संतांचे जीवन प्रेरणादायी असून, त्यांच्या जीवनकार्यातून आपल्याला विचारच नाही तर जीवनाचा मार्गही गवसतो. संत नामदेवांनी भागवत धर्माला वैश्विक धर्म केले आणि वारकरी विचाराला देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवले.

वारकरी संप्रदायात त्यांचे कार्य महान होते. अशा संतांचे विचार समाजापर्यंत पोहोचले पाहिजे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## संपादकीय ......

# हवी शुद्ध हवा!

हवामान बदल, जैवविविधता नष्ट होणे आणि प्रदूषण ही संकटे पृथ्वीवासीयांचे अस्तित्व धोक्यात आणत आहेत, असा इशारा संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी गेल्याच वर्षी दिला होता. ही संकटे एकमेकांशी घट्ट जोडलेली आहेत. प्लास्टिक हे पाणी, तर वायू प्रदूषण हे जीवाश्म इंधनाच्या वापराशी आणि पर्यायाने कार्बन उत्सर्जन तसेच हवामान बदलाशी जोडलेले आहे. जलप्रदूषण हे जीवाश्म इंधनाद्वारे चालवलेल्या औद्योगिकीकरणाशी निगडित आहे. तसेच जैवसंतुलन राखण्यात मदत करणार्या पक्षी, मधमाश्या आणि फुलपाखरे यासारख्या प्रजाती धोक्यात येणे, हे शहरीकरण आणि प्रदूषणाशी निगडित आहे.

तापमान नोंदवण्यास सुरुवात झाल्यापासून २०२४ हे सर्वात उष्ण वर्ष ठरले. या पार्श्वभूमीवर, भारताने गेल्या काही वर्षांत केलेल्या काही उपाययोजनांना यश मिळत आहे, असे दिसते. देशात राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमांतर्गत (एनसीएपी) येणार्या शहरांपैकी १०३ शहरांमध्ये २०१७-१८च्या तुलनेत २०२४ मध्ये पीएम-१०च्या पातळीत सुधारणा झाल्याचे सरकारी आकडेवारीतून समोर आले आहे. मुंबईच्या पीएम १० प्रदूषण पातळीत सर्वाधिक, म्हणजे ४४ टक्के घट नोंदवली आहे. यानंतर कोलकाता ३७ टक्के, दिल्ली १५ टक्के आणि चेन्नई १२ टक्के अशी प्रदूषण पातळीत घट नोंदवली आहे. पीएम १० म्हणजेच १० मायक्रोमीटर किंवा त्यापेक्षा कमी व्यासाचे कणयुक्त पदार्थ. ६४ शहरांत पीएम १०च्या पातळीत २० टक्क्यांपेक्षा अधिक घट झाली आहे आणि त्यापैकी २५ शहरांत ४० टक्क्यांपेक्षा अधिक घट झाली आहे, ही नक्कीच दिलासादायक बाब आहे. भारतीय शहरांमध्ये वाढत्या हवा प्रदूषणामुळे आरोग्यावर होणार्या परिणामांचा विषय महत्त्वाचा आहे. मुंबईत सरासरी पीएम १० पातळी ही २०१७-१८ मध्ये १६१ मायक्रोग्राम प्रतिघनमीटरवरून पुढील सहा वर्षांत ९० घनमीटरपर्यंत घसरली.

याच कालावधीत कोलकात्याची पातळी १४७ वरून ९२, दिल्लीची २४१ वरून २०३ आणि चेन्नईची ६६ वरून ५८ घनमीटरपर्यंत घसरली. याचा अर्थ मुंबईने सर्वोत्कृष्ट कामगिरी करून दाखवली आहे. २२ शहरांनी वार्षिक पातळी ६० मायक्रोग्राम प्रतिघनमीटरपेक्षा कमी करण्यात यश मिळवले आहे, ही निश्चितच भूषणावह गोष्ट आहे. आज भारतातील केवळ महानगरेच नव्हेत, तर इतर शहरांतील लोकसंख्या मर्यादेबाहेर फुगत आहे. नोकरी-व्यवसायासाठी करोडो लोक खेड्यापाड्यांतून शहरांकडे धाव घेत आहेत. शहरात येऊन ते कारखान्यांत काम करतात. अनेक लहान-मोठ्या कारखान्यांत नियम पाळले जात नाहीत. त्यामुळे कामगारांना धुराच्या त्रासात काम करावे लागते. एकाच वेळी हजारो वाहने रस्त्यांवरून धूर ओकत जात असतात. सांडपाणी बिनधास्तपणे नद्यांमध्ये सोडले जाते.


ही सर्व बिकट स्थिती लक्षात घेऊनच देशातील १३० अतिप्रदूषित शहरांमध्ये २०२६ पर्यंत कणयुक्त प्रदूषण ४० टक्क्यांनी कमी करणे, हे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण संस्थेचे (एनसीईपी) उद्दिष्ट आहे. यामध्ये प्रत्यक्षात कामगिरीचे मूल्यांकन करताना केवळ पीएम १० पातळी विचारात घेतली जाते. कारण, पीएम १० किंवा १० मायक्रोमीटर किंवा त्यापेक्षा कमी व्यासाचे कणपदार्थ हा हवेची गुणवत्ता बिघडवण्यास आणि श्वसनरोगांना कारणीभूत ठरणारा एक प्रमुख प्रदूषणकारी घटक आहे.

दोन वर्षांपूर्वी मुंबईतील हवा प्रदूषण कमालीचे वाढले होते आणि त्यामुळे चिंता निर्माण झाली होती. अशावेळी मुंबईत ट्रकमधून वाळू, माती आणि अन्य माल आणताना तो बंदिस्त स्वरूपात आणला पाहिजे, यासारखे नियम लागू केले. मुंबई, पुण्यासारख्या शहरांत मोठमोठे बिल्डर्स नियमांचे पालन करत नाहीत. समुद्राच्या बांधणीत अथवा नदीमध्ये बांधकामे करणे, त्यासाठी खारफुटी उद्ध्वस्त करून भराव टाकणे, दुसरीकडे अनधिकृतपणे वाळू उपसा करणे, टेकड्यांवरील झाडे तोडून इमारती बांधणे, बेकायदेशीररीत्या वृक्षतोड करणे अशाच अनेक गोष्टी सर्रासपणे घडत आहेत.

आता एनसीईपी आणि १५ व्या वित्त आयोग अनुदानांतर्गत एकूण १३,००० कोटी रुपये जारी केले आहेत. त्यापैकी ९,२०० कोटी रुपये आतापर्यंत राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये वापरले आहेत. त्यामध्ये उत्तर प्रदेशला सर्वाधिक म्हणजे २,८२२ कोटी, तर त्यानंतर महाराष्ट्राला १,७७४ कोटी रुपये मिळाले आहेत. ४८ दशलक्षांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांना वित्त आयोगाद्वारे, तर उर्वरित ८२ शहरांना प्रदूषण नियंत्रण योजनेंतर्गत निधी दिला जात आहे. एनसीईपीच्या या योजनेचा विस्तार झाल्यास छोट्या शहरांनाही त्याचा फायदा होऊ शकेल. केंद्र सरकारने वीज प्रकल्पांना सल्फर नियंत्रण सूट दिली असतानाच सर्वात मोठे औष्णिक वीज केंद्र असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यात मात्र वीज केंद्रातून बाहेर पडणार्या राखेपासून होणार्या प्रदूषणामुळे तेथील सामान्य लोकांना श्वसनरोगासह अन्य आजारांनी ग्रासले आहे. मागील सात महिन्यांत प्रदूषणामुळे झालेल्या आजाराने चंद्रपूरमधील ५५ लोकांचे मृत्यू झाले आहेत, तर सुमारे ५,००० लोक हे प्रदूषणबाधित रुग्ण असल्याची नोंद झाली आहे. नद्यांमध्ये रासायनिक पाणी तसेच दूषित सांडपाणी सोडले जाते. पालघर जिल्ह्याच्या वाडा तालुक्यातील प्रदूषणकारी अशा टायर पायरोलेसिस कंपन्यांचा मुद्दाही महाराष्ट्राच्या पावसाळी अधिवेशनात गाजला.

वाडा तालुक्यात ७० हून अधिक रबर पायरोलेसिसचे कारखाने असून, ते नियम धाब्यावर बसवून सुरू आहेत. विदेशातून येणार्या टायरचे विशिष्ट वातावरणात विघटन करून त्यापासून कार्बन ब्लॅक पायरो ऑईल तसेच स्टीलचे उत्पादन घेतले जाते. त्यामुळे प्रचंड प्रदूषण होत असल्याने त्याचा फटका बसून नागरिक श्वसनाच्या तसेच त्वचारोगाने त्रस्त झाले आहेत. हे सर्व पाहता पर्यावरण आणि प्रदूषणाच्या नियमांचे पालन न करणार्यांना कठोर शासन झाले पाहिजे. तसेच देशाच्या प्रदूषण मंडळांमधील तसेच पर्यावरण विभागांचा कारभारही सुधारायला हवा, तरच प्रदूषण कमी होण्यास हातभार लागेल.

# पालकांच्या अध्यक्षतेसाठी उत्सव कायदे बैठक



## भाविकांसाठी आवश्यक सुविधा; उत्सव परवानगी कार्यक्रमासाठी एक खिडकी योजना
## पालक मंत्री ॲड . आकाश फुंडकर निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अकोला**

अकोला जिल्ह्याला पालखी उत्सवाची वैशाली परंपरा असून उत्सव कायदे व सुव्यवस्था राखताना सर्व आवश्यक सुविधा निर्माण करणे. नियुक्ती करणे आवश्यक आहे, मंडळांना आवश्यक परवाण एक खिडकी गैरसोयीची योजना करावी, असे निर्देश राज्याचे राज्यमंत्री तथा पालकमंत्री ड . आकाश फुंडकर यांनी आज येथे दिले.कावडखी उत्सव श्री गणेशोत्सवात स्थानिक उत्तीर्ण व अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था सुविधांचा आस्थापना व पालकाच्या आवश्यक अध्यक्षतेखालील मतदारसंघात गामनात मात्र आला , संपूर्ण ते बोलत होते. आमदार वसंतेलवाल खंड , अजित कुंभार , पोलिस अधीक्षक अर्जित चांडक , मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मेश्राम, विलास अप सुनील लहाने , महिला पोलिस अधीक्षक सी.के. रेड्डी, निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील उपस्थित होते.पालक मंत्री ड. फुंड की , कावड पालखीसाठी सुरळीत मार्ग, सुरक्षिततेसाठी आवश्यक बॅरिकेटिंग, पेयजल, स्वच्छता गृहे याबरोबरच आरोग्य संस्थांची पुरेशी व्यवस्था व्यवस्था. पालखीची परंपरा व पावित्राची जपणूक व्हावी. हा उत्सव शांतता व सुसह पारावा. कायदे व सुव्यवस्था अबाधित राखून भाविकांना सर्व आवश्यक सुविधा चोखपणे पुरवणे. ही वैशाली परंपरा वृध्दिंगत करण्यासाठी मंडळांनी डॉ. डीजेचा वापर सुरू करून झांजा ताशे समुदाय, दिंडी आदि पारंपरिक वापराचा वापर व्हावा, असे आवाहन त्यांनी केले.

कावड यात्रा, गणेशोत्सव मिरवणूक मार्गावर अतिक्रमणे असल्याने महिला मोठ्या प्रमाणात प्राप्त होत आहेत. अतिक्रमणे असतील ती तत्काळ काढावीत व मार्ग मोकळा उघडा. पर्यायी तसेच प्रोच मार्ग मोकळे मांडत. सुरक्षित दृश्टीने रेलिंग, चटॉवर, सीसीटीव्ही, सरळवॉक बॅरिकेटिंग, पुलाची दुरूस्ती, विस्तारा लोककळ संपूर्ण दूर करणे सर्व उपाय करणे आवश्यक आहे तारा काटेर अंमलातावेत, असे निर्देश पालकनी दिले. सर्व भाविकांची सुरक्षितता जपली जावी, तथापि दुर्देवाने काही घडल्यास संबंधीत सीएम रिलीफ फंडातून मदत मिळावी यासाठी शासन पाठपुरावा करण्यात येईल. मात्र अशी घटना घडू नये यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

पारंपरिक उत्साही लोकांचा वापर करून डीजेमुक्त उमेदवार श्री. सावरकर यांनी केले. शिवभक्त मंडळ, गणेशोत्सव मंडळाचे सदस्य तसेच विजय अग्रवाल, सिद्धार्थ शर्मा, अनिल गरड, सतीश ढेगे, चंदू सावजी, अमोल गोगे, जयंत मसने, बंटी चौरसिया अशा अनेक मान्यवरांनी विविध सुचना केल्या. भावधारकांसाठी सर्व आवश्यक सुविधा निर्माण पालक निर्देशांक प्रशासकाला देतात.




## अच्छा.. तर 'हे' आहे लठ्ठपणा वाढण्याचं मुख्य कारण!

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**

लठ्ठपणा जगभरात अनेकांना छळतो आहे. लोक वजन कमी करण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न करतात. जिममध्ये तासंतास घाम गाळला जातो. वेगवेगळ्या डाएट फॉलो केल्या जातात. आतापर्यंत आपण हेच ऐकत आलो आहोत की, जास्त वेळ बसून काम केल्यानं आपलं वजन वाढत आहे. जंक फूड, फास्ट फूडही यासाठी जबाबदार असतात. पण एका नव्या शोधानं या गोष्टी पूर्णपणे बदलून टाकल्या आहेत.




**३४ देशातील ४,२०० लोकांवर अभ्यास**- शोधात ३४ देशातील ४,२०० पेक्षा जास्त लोकांचा अभ्या करण्यात आला आहे. यात अमेरिकेसारख्या देशातील ऑफिस वर्करपासून ते शेती करणाऱ्या लोकांचा समावेश होता. तसेच यातून आढळून आलं की, कुणी ॲक्टिव असो किंवा केवळ बसून काम करत असो, सगळ्यांचा कॅलरी बर्न करण्याचा वेग सारखाच असतो.

**वजन वाढण्याचं खरं कारण...**

फक्त व्यायाम केला नाही म्हणून लोक लठ्ठ होत नाहीयेत. तर आपलं खाणं-पिणंही त्यासाठी तेवढंच जबाबदार असतं. शोधातून आढळून आलं की, जेव्हा एखादा देश प्रगती करतो, तेव्हा लोकांकडे खायला खूप काही असतं. तेव्हा लोक प्रमाणापेक्षा जास्त खाऊ लागतात. अलिकडे तर लोकांना फास्ट फूड अधिक आवडतं. लोकांची हीच सवय त्यांना हळूहळू लठ्ठ बनवत आहे.

**चुकीचं खाणं-पिणं मुख्य कारण..**

शोधात डॉ. पॉन्ट्जर यांचं म्हणणं आहे की, लठ्ठपणा वाढण्यामागे सगळ्यात मोठं कारण जास्त खाणं आहे. ते म्हणाले की, व्यायाम कमी करण्याच्या तुलनेत चुकीच्या खाण्या-पिण्यामुळे वजन १० टक्के अधिक वाढतं. दुसरे हेल्थ एक्सपर्ट्स प्रोफेसर बॅरी पॉपकिन आणि डॉ. मोजाफेरियन यांचंही हेच मत आहे की, लोकांनी हे समजायला हवं की, व्यायामापेक्षा जास्त गरजेचं आहे की, आपण हेल्दी आहार घ्यावा.

**व्यायामही महत्वाचा**

डॉक्टरांनी सांगितलं की, जर खाण्या-पिण्यामुळे लठ्ठपणा वाढत असेल तर याचा अर्थ असा अजिबात नाही की, आपण व्यायाम करणं बंद केलं पाहिजे. जास्त वेळ सोफ्यावर पडून रहावं. व्यायाम केल्यानं आपलं हृदय, मेंदू आणि शरीर फीट राहतं. पण लठ्ठपणा टाळण्यासाठी आहार योग्य असणं गरजेचं आहे.

# परदेश अभ्यास दौऱ्याकरीता कशी होणार शेतकऱ्यांची निवड? काय आहेत निकष?

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**

राज्यातील शेतकऱ्यांचे केवळ उत्पादन व उत्पादकता वाढविणे हे ध्येय यापुढे न राहता उत्पादित होणाऱ्या शेतमालाची दर्जात्मक सुधारणा करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांनी करणे अत्यंत गरजेचे आहे.

शेतीशी निगडीत घटकांबाबत जगात वेळोवेळी होत असलेले बदल, विकसीत होत असलेले तंत्रज्ञान हे शेतकऱ्यांपर्यंत त्यांच्या गरजेनुरुप योग्यवेळी पोहचविणे आणि त्यासाठी आवश्यक सहाय्य व सोयीसुविधा पुरविणे निकडीचे आहे.कृषि विस्तार कार्यक्रमामध्ये शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देण्याकरीता करावयाच्या विविध उपाययोजनांसाठी कृषि विभागाकडुन राज्यातील शेतकऱ्यांचे परदेश दौरे ही योजना राबविणेत येत आहे.

**परदेश अभ्यास दौऱ्याकरीता शेतकरी निवडीचे निकष**- अभ्यास दौऱ्याकरीता जाणारा लाभार्थी हा स्वतः शेतकरी असावा.

स्वतःच्या नावे चालु कालावधीचा (मागील सहा महिन्यातील) ७/१२ व ८-अ उतारा असणे आवश्यक आहे.




शेतकऱ्याच्या उत्पनाचे मुख्या साधन शेती असावे व तसे त्याने स्वयंघोषणापत्रात नमुद करावे (प्रपत्र-२)

शेतकऱ्याचे ॲग्रीस्टॅक अंतर्गत फार्मर आय डी असणे आवश्यक आहे.

शेतकरी कुटुंबामधुन फक्त एकाच व्यक्तीला या योजनेचा लाभ घेता येईल. निवडलेल्या लाभार्थी शेतकऱ्याने स्वखर्चाने जरी इतर कुटुंब सदस्यास सोबत घ्यावयाचे असेल तरी सहल व्यवस्थापनास येणाऱ्या संभाव्य अडचणीमुळे त्यास परवानगी दिली जाणार नाही. सोबत शिधापत्रिकेची झेरॉक्स प्रत जोडावी. (कुटुंब या व्याखेमध्ये पती, पत्नी व त्यांचे १८ वर्षाखालील मुले मुली)

शेतकऱ्याने त्याच्या आधार प्रमाणपत्राची प्रत जोडणे आवश्यक आहे.

शेतकऱ्याचे वय सहलीला निघण्याच्या दिवसी २५ वर्षे पुर्ण असावे. कमाल वयाची अट नाही परंतु शेतकरी शारीरीकदृष्ट्या तंदुरुस्त असल्याबाबतचे वैद्यकिय प्रमाणपत्र (किमान एम.बी.बी.एस डॉक्टरचे) सादर करावे.शेतकऱ्याची अभ्यास दौऱ्याकरीता निवड झाल्याचे पत्र कृषि विभागाकडुन मिळाल्यानंतर देखील शेतकऱ्याने परदेश दौऱ्यासाठी शारीरीकदृष्या तंदुरुस्त असल्याबाबतचे वैद्यकिय प्रमाणपत्र (किमान एम.बी.बी.एस डॉक्टरचे) सादर करावे. कोरोनाविषयक तपासणी करुन तसा अहवाल कृषि विभागास सादर करणे बंधनकारक आहे. या अहवालानुसार शेतक-यास कोणत्याही प्रकारच्या संसर्गजन्य रोगाची लागण झाली नसल्याचे तसेच सलग ७-१० दिवस कालावधीचा परदेश दौरा करण्यास शेतकरी शारीरीकदृष्या पात्र असल्याचे डॉक्टरांनी प्रमाणित करणे बंधनकारक राहील.शेतकरी वैध पारपत्रधारक असावा, पुराव्यासाठी पारपत्राची मुदत/वैधता दर्शविणाऱ्या पानाची झेरॉक्स प्रत जोडावी. पारपत्राची वैध मुदत दौरा निघताना किमान तीन महिन्यापेक्षा जास्त असावी. शेतकरी शासकिय, निमशासकिय, सहकारी, खाजगी संस्थेत नोकरीस नसावा, तसेच वैद्यकिय क्षेत्रातील डॉक्टर, वकिल, सीए (चार्टड अकाउंटट), अभियंता, कंत्राटदार इ. नसावा. तसे त्याने स्वतः स्वयंघोषणापत्रात नमुद करावे.




शेतकऱ्याने यापुर्वी शासकिय (केंद्र/राज्य शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत, कृषि विद्यापिठामार्फत तसेच स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत) अर्थसहाय्याने विदेश दौरा केलेला नसावा, तसे त्याने स्वतः स्वयंघोषणापत्रात नमुद करावे. शेतकरी निवडीबाबत अंतिम अधिकार राज्यस्तरीय समितीकडे राखीव असतील.

अधिक माहितीसाठी जवळील सहाय्यक कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधा.


शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०


# अत्याचारानंतर लावला बालविवाहः युवकासह ८ जणांविरुध्द गुन्हा दाखल

## रुग्णालयात उघडकीस आले प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४वरूड**: अत्पवयीन मुलीशी शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याने तिला गर्भधारणा झाली. हे प्रकरण उघडकीस आल्यामुळे नातेवाईकांनी नाईलाजाने त्या युवकाचा तिच्यासोबत लग्न लावुन दिलेः परंतु सदर मुलीला रुग्णालयात प्रसूतीसाठी नेले असता तेथे ती अल्पवयीन असल्याचे उघडकीस आले. त्यामुळे पोलिसांनी याप्रकरणी अल्पवयीन युवतीच्या पतीसह एकूण ८ नातेवाईकांविरुध्द गुन्हा दाखल करून मध्यप्रदेश पोलिसांकडे वर्ग केला आहे.



सुरेश अंकुश सरीयाम (२१), अंकुशइंदरसा सरीयाम (६०), महिला (५५), लवकुश इंदरसासरीयान (४५), महिला (४०) सर्व रा. पिपराणी ता. जि. पांढुर्णा, सुभाष रामदास पदाम (५०), महिला (४५) रामदास जनु पदाम (६५) सर्व रा. बोरगाव ता.जि पांडुर्णा अशी आरोपींची नावे आहे. फिर्यादीचे आरोपी सुरेश अंकुश सरोवान यांच्यासोबत प्रेमसंबंध असून हा पीडितेसोबत लग्न केले.असल्याने नमूद घटनास्थळी पीडितेचे आरोपी सुरेश अंकुश सरीयान याच्यासोबत शारीरिक संबंध प्रस्थापित झाले.

त्यानंतर पीडितेचा सुरेश सरीयान याच्यासोबत आरोपी यांच्यासमक्ष विवाह झाला व त्यातून ती गरोदर असून ती ग्रामीण रुग्णालय वरुह येथे प्रसूतीकरिता भरती झाली व तिची प्रसूती झाली आहे.

अशा पीडितेच्या बयाणावरून तसेच सदर पीहिल ही अल्पवयीन असून तिचा बालविवार झाला असल्याने सदरचा गुन्हादाखल करुन सदर गुन्ह्यातील घटनास्थळ हे पोलिसस्टेशन पांदुर्णा मध्यप्रदेश येथील पोलिसांकडे वर्ग करण्यात आले असल्याने सदर गुन्हा वर्ग करण्यात आला आहे.

आरोपीविरुध्द कलम ६४ (१), ३ (५), भा. न्या. सं. सहकलम ९. १०, ११ बालविवाह प्रतिबंधक कायदासह कलम ६ पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई ठाणेदार अर्जुन ठोसरे याच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी केली.


आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा
# विदर्भ प्रजासत्ताक
गुरुवार दि. २४ जुलै २०२५
शहर/ग्रामिण

# रेल्वे पुलावरील जड वाहतूक बंद

## सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अहवालावर वाहतूक विभागाचे आदेश




### हे राहणार पर्यायी मार्ग

हमालपुराकडून येणारी प्रतिबंधित वाहने बसस्थानक मार्गे रेल्वेस्थानक, शवविच्छेदनगृह टी पॉइंट असे नेण्यात यावे.

बसस्थानकाकडून येणारी प्रतिबंधित वाहने रेल्वेस्थानक, शवविच्छेदनगृह टी पॉइंट मार्गाने जातील.

राजकमल चौक व जयस्तंभ चौकाकडून येणारी प्रतिबंधित वाहने राजापेठ पोलीस ठाणे, राजकमल चौक, जयस्तंभ चौक, मार्ग मालवीय चौक या मार्गाचा वापर करतील.–

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

सार्वजनिक बांधकाम विभागाने १९६३ मध्येबांधलेला अमरावती शहरातील सर्वात जुना पूल राजकमल चौक, हमालपुरा, रेल्वेस्थानक चौकाला जोडणाऱ्या रेल्वेपुलाची सद्यःस्थिती समाधानकारक नसल्याच्या रेल्वे विभागाच्या अभिप्रायावरून व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुचनेवरून शहर वाहतूक शाखेने बुधवार रात्री पासून रेल्वेपूलावरील जड वाहनांना प्रवेश बंदी करण्याची अधिसूचना जारी केली आहे. त्यासोबतच जड वाहनांकरिता पर्यायी मार्गाचे नियोजन करण्यात आलेले आहे.

शहर वाहतूक विभागाने अधिसूचना जारी करीत अमरावती शहरातील मुख्य रेल्वेस्थानकाजवळील राजकमल चौक, हमालपुरा, जयस्तंभ चौक, रेल्वेस्थानक चौक या मार्गांना जोडणाऱ्या रेल्वेपुलावरील जड वाहतूक बंद केलेली आहे. बुधवार २३ जुलै रात्री आठ वाजतापासून या मार्गावरून मालवाहू ४०७मिनी ट्रक, ट्रक, टिप्पर, लहान ट्रक आदींना घालण्यात आली आहे. सन १९६३ मध्ये बांधलेल्या या रेल्वेपुलाची सद्यःस्थिती समाधानकारक नसल्याने त्या जागी नवीन रेल्वेपूल बांधण्याची आवश्यकता असल्याचे रेल्वे विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाला कळविले होते. सार्वजनिक बांधकाम विभागाने रेल्वेपुलाचे संरचनात्मक लेखापरीक्षणसुद्धा सुरू केलेले आहे. प्राथमिक अहवालानुसार अस्तित्वात असलेल्या रेल्वेपुलाचे स्टील गडर्स गंजलेले आहेत. डेक स्लॅबमध्ये अनेक ठिकाणी फ्लेक्स आणि शेअरक्रॅकिंग, डेक स्लॅबमध्ये गळती व स्टील गडर्सना आधार देणाऱ्या गॅपमध्ये गळतीसारख्या मोठ्या स्ट्रक्चरल अडचणी आढळून आलेल्या आहेत. त्यानुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंतांना पत्र देऊन पुलाच्या कमकुवत घटकांवरील ताण कमी करण्यासाठी हा पूल फक्त हलक्या वाहतुकी करता खुला करून वाहतूक मर्यादित ठेवावी. जड वाहनांना बंदी करण्यात यावी, असे पत्रात नमूद करण्यात आलेले होते. त्यानुसार या पुलावरून दुचाकी, ऑटोरिक्षाहलके चारचाकी वाहन वगळता उर्वरित सर्व जड वाहनांसाठी वापर बंद करण्यात आलेला आहे. जड वाहतूककर्तीसाठी तीन पर्यायी मार्गांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. पुढील आदेशापर्यंत पर्यायी मार्गाचा अवलंब करण्यात यावा, असेही अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

# अप्पर वर्धा धरणाचा जलसाठा आता ५१ टक्क्यांवर



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती–**

मोर्शी तालुक्यात मंगळवारी मुसळधार पावसामुळे नदी, नाले ओसंडून वाहत आहेत. त्यातच धरण क्षेत्रातही जोरदार पावसाने हजेरी लावल्याने ऊर्ध्व वर्धा धरणाच्या पातळीत वाढ होऊन पाणीसाठा ५१.७टक्यावर पोहोचला आहे.

३१ जुलै अखेरीस ३४०.७८ मिटरपर्यत पातळी वाढल्यास धरणाची वक्रद्वार केव्हाही उघडून पाण्याचा विसर्ग नदीपात्रात करण्यात येणार आहे. दरम्यान १९ जुलै रोजी धरण केवळ ४८.६२ टक्केच भरले होते. परंतु मंगळवारी तालुक्यातमुसळधार पावसाने हजेरी लावल्यामुळे जलाशयाच्या पातळीत वाढ होऊन पाणीसाठा ५१.७ टक्यावर पोहोचला आहे. अप्पर वर्धा धरणाची निर्धारित जलाशयाची पातळी ३४२.५० मीटर ठेवण्यात आलेली आहे. यावर्षीचा पावसाळा सुरू झाल्यानंतर दोन दिवसाच्या पावसामुळे मध्यप्रदेशातून वाहत येणाऱ्या माडू नदीला थोडेफार पाणी येऊन अप्पर वर्धा धरणाच्या जलाशयाची पातळी दोन सेंटीमीटरने वाढली होती. गेल्या आठवड्यात मोर्शी शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात पावसाने सतत चार ते पाच दिवस जोरदार हजेरी लावली होती. मात्र अप्पर वर्धा धरणाच्या पाणलोटक्षेत्रात पाऊस कमी कोसळल्यामुळे धरणाच्या जलाशयात पाण्याची वाढ होऊ शकली नाही. परिणामी जुलैच्या अखेरीस सुद्धा जलाशयाची पातळी घटली आहे. अप्पर वर्धा धरणाच्या जलाशयातून मोर्शी, अमरावती, रतन इंडियाबुल्स कंपनी, एमआयडीसी यासह हिवरखेड, लोणी, राजुरा यासह इतर गावात पाणीपुरवठा होत आहे. १५ जुलैनंतर पाऊस मोठ्या प्रमाणात कोसळतो. त्यामुळे पातळीत झपाट्याने वाढ होत असते. गेल्यावर्षी ५ ऑगस्टला अप्पर वर्धा धरणाच्या तेरा पैकी दोन वक्रव्दार उघडण्यात आली होती. त्यानंतर १२ ऑगस्ट रोजी १३ पैकी ११ वक्रव्दार ४० सेंटीमीटरने उघडण्यात येऊन ६९३ क्युसेक घनमीटर प्रति सेकंद पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात आला होता. वरूड बगाजी धरणाचे तीन वक्रव्दार बुधवारी (ता.२३) २० से.मी.ने उघडण्यात आलेली आहे, वर्धा नदिपात्रात विसर्ग करण्यात आला आहे. धरण २२ जुलै सायंकाळपर्यंत ६९ टक्के भरलेले आहे. नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा प्रशासना कडून देण्यात आला आहे.

# कृषी अधिकाऱ्याच्या टेबलवर टाकल्या अळ्या

## नांदगाव तालुक्यात हुमणी अळीचा प्रकोप, सर्वेक्षणाची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४नांदगाव खंडेश्वर**

३तालुक्यात सोयाबीन पिकावर हुमणी अळीचा प्रकोप वाढल्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे, असे सांगत शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयात धडक देऊन कृषी अधिकाऱ्यांच्या टेबलवर हुमणी अळ्या टाकत तत्काळ नर्वेक्षण करून नुकसान भरपाईची बागणी केली.पेरणीच्या एक ते दीड महिन्यानंतरपीके चांगली दिसत असताना अचानक पिके सुकायला लागली.हुमणी अळीच्या प्रकोपाने सोयाबीनची झाडे सुकत असल्याने शेतातील पीक पेरणी व लागवडीचा पूर्ण खर्च वाया गेला आहे. तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे पिके सूकत असतील, असा शेतकऱ्याचा समज होता.म्हणून शेतकऱ्यांनी पिकांना पाणी दिले तरीसुद्धा पिके सुकायला लागली. आठ दिवसात सोयाबीन व तुरीचे पिक सुकल्याने शेतकऱ्यांनी सुकलेल्यापिकात वखरणी केली असता मोठ्या प्रमाणात जमिनीतील अळया वर झाडाची मुळे खात असल्याने पिके आल्यात.

हुमणी अळी जमिनीतच सुकत आहे.याचे तत्काळ सर्वेक्षण करून नुकसानीचा अहवाल शासनास सादर करावा व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेचे विधानसभा समन्वयक प्रकाश मारोटकर यांच्यासह रितेश जाधव, अनिरुद्ध पकडे, निलेश नेवारे या शेतकऱ्यांनी केली.

# जिप जिल्ह्यांतर्गत बदली प्रक्रिया सुरू संवर्ग एक मध्ये ४४ शिक्षकांच्या बदल्या

## एकूण सात पैकी टप्पा दोन सुरू संवर्ग दोन मधील १७२ शिक्षक प्रतिक्षेत




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती** – जिल्हा परिषदेच्या शिक्षकांची जिल्ह्यांतर्गत बदली प्रक्रिया सुरू आहे. एकूण सात टप्प्यांत बदल्या करण्यात येणार असून, संवर्ग १ मधील ९४ शिक्षकांपैकी केवळ ४४ शिक्षकांची ऑनलाइन बदली झाली आहे. त्याशिवाय, संवर्ग २ मधील १७२, बदली अधिकार प्राप्त ३७१, बदलीस पात्र ६१ आणि मेळघाटातून सपाटीवर बदलीसाठी येण्यास ३३९ शिक्षकांनी बाशिग बांधले आहेत.शैक्षणिक वर्षास २३ जूनपासून प्रारंभ होतो. यादृष्टीने मे मध्ये शिक्षकांची बदली प्रक्रिया पूर्ण केली जाते. परंतु यंदा उन्हाळी सुटी संपून शाळा सुरू झाल्या तरी बदली प्रक्रिया अद्यापही सुरू आहे. याअंतर्गत पहिल्या टप्प्यात संवर्ग १ मध्ये ४४ शिक्षकांची बदली करण्यात आली.संवर्ग दोन अंतर्गत पात्र ठरणाऱ्या शिक्षकांना आता 'प्राधान्य अर्ज' भरण्याची संधी २२ जुलैपर्यंत दिली होती. याकरिता १७२ शिक्षक पात्र आहेत. त्यानंतर पुढील टप्पा राबविला जाणार आहे. बदली अधिकार प्राप्तमध्ये ३७१ शिक्षक मेळघाटातून सपाटीवर येण्यास इच्छुक आहेत. ६१ शिक्षक बदलीपात्र असून सातव्या टप्प्यात ३३९ शिक्षकांच्या मेळघाटात प्रशासकीय बदलीहोणार आहे. बदली प्रक्रिया सुरू असली तरी शिक्षकांना शैक्षणिक सत्र सुरू असल्यामुळे कार्यमुक्त करण्याची प्रक्रिया दिवाळीत किवा उन्हाळ्यात होण्याची शक्यता आहे. गादृष्टीने मे मध्ये शिक्षकांची बदली प्रक्रिया पूर्ण केली जाते. परंतु यंदा उन्हाळी सुटी संपून शाळा सुरू झाल्या तरी बदली प्रक्रिया अद्यापही सुरू आहे. याअंतर्गत पहिल्या टप्प्यात संवर्ग १ मध्ये ४४ शिक्षकांची बदली करण्यात आली. संवर्ग दोनअंतर्गत पात्र ठरणाऱ्या शिक्षकांना आता 'प्राधान्य अर्ज' भरण्याची संधी २२ जुलैपर्यंत दिली होती. याकरिता १७२ शिक्षक पात्र आहेत. त्यानंतर पुढील टप्पाराबविला जाणार आहे. बदली अधिकार प्राप्तमध्ये ३७१ शिक्षक मेळघाटातून सपाटीवर येण्यास इच्छुक आहेत. ६१ शिक्षक बदलीपात्र असून सातव्या टप्प्यात ३३९ शिक्षकांच्या मेळघाटात प्रशासकीय बदली होणार आहे. बदली प्रक्रिया सुरू असली तरी शिक्षकांना शैक्षणिक सत्र सुरू असल्यामुळे कार्यमुक्त करण्याची प्रक्रिया दिवाळीत किवा उन्हाळ्यात होण्याची शक्यता आहे.

# दत्तवाडीतील घरावर पोलिसांचा छापा

## पिस्तूल, ५ तलवारी, ३ चाकूसह शस्त्रसाठा जप्त




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती–**

शहरातील दत्तवाडी परिसरातील एका घरातून नांदगावपेठ पोलिसांनी मोठा घातक शस्त्रसाठा हस्तगत केला आहे. या कारवाईत पोलिसांनी ५ तलवारी, ३ चायनाचाकू, १ पिस्टल व इतर चाकूंसह एकूण १० हून अधिक घातक शस्त्रे जप्त केली आहेत. कुख्यात आरोपी दिपेश दिपक काकडे याच्या घरावर छापा टाकून ही बुधवारला सायंकाळी ही धाडसी कारवाई करण्यात आली.माहितीनुसार, नांदगावपेठ पोलिस ठाण्याचे ठाणेदार पीआय दिनेश दहातोंडे यांना दत्तवाडीतील नक्षत्र बिल्डिंगच्या मागे राहणाऱ्या अनेक गुन्ह्यात रेकॉर्डवर असलेल्या कुख्यात आरोपी दिपेश दिपक काकडेच्या घरात मोठ्या प्रमाणावर अवैध शस्त्रसाठा असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार, सायंकाळच्या सुमारास पोलीस पथकासह पीआयदहातोंडेयांनी आरोपीच्या घरावर छापा टाकला. पोलीस पथकाने दिपेश काकडेच्या घराची झडती घेतली असता, दिवानच्या बॉक्समध्ये लपवून ठेवलेला घातक शस्त्रसाठा उघडकीस आला. त्यामध्ये ५ तलवारी, ३ चायना चाकू, १ देशी बनावटीचेपिस्टल, इतर ६ धारदार चाकू असे घातक शस्त्र सापडले. एवढ्या मोठ्या प्रमाणावर घातक शस्त्रे एका घरात ठेवण्यात आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. वृत्त लिहेस्तोव पोलीस दिपेशच्या घराचीझडतीघेण्याचे काम सुरूच होते. पोलिस या शस्त्रसाठ्याचा उद्देश काय, तो कुठून आणला गेला, आणि त्याचा वापर कोणत्या कारणासाठी होणार होता, याबाबत कसून चौकशी करित होते. विशेष म्हणजे पोलिसांनी धाड टाकली त्यावेळी दिपेशहा घरी हजर नव्हता. कारवाई सुरु असताना घराच्या जवळपास आल्याची माहिती आहे. मात्र पोलिसांचा ताफा पाहून त्यानेपळकाढला. पोलिस आरोपी दिपेशचा कसून शोध घेत आहे. शहरात सण–उत्सवाचा हंगाम सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर एवढा मोठा शस्त्रसाठा मिळण ही गंभीर बाब आहे.

# अचलपूर बाजारसमितीत कोट्यवधींचा अपहार उघडकीस

## अंकेक्षण अहवालामुळे फुटले बिंग प्रशासकासह कर्मचाऱ्यांवर ठपका

> बाजारसमितीला प्राप्त झालेल्या ऑडिट नोटमध्ये ज्यांच्यावर ठपका ठेवण्यात आला, अशा संबंधित सर्व कर्मचाऱ्यांना आज नोटीस बजावणार आहे. सभापतींनी तशा सूचना दिल्या असून सूचनेची अंमलबजावणी केली जाईल.
>
> **–योगेश चव्हाण,**
> सचिव (प्र.) बाजारसमिती, अचलपूर.

> दिनांक २१ जुलै रोजी पार पडलेल्या बाजारसमितीच्या जनरल सभेमध्ये सदर ऑडिट नोटचे वाचन करण्यात आले. या अपहारामुळे बाजार समितीचे फार मोठे नुकसान झाले आहे. याबाबत पुढची कायदेशीर प्रक्रिया पार पाडली जाईल.
>
> **सौ. प्रतिभाताई प्र. ठाकरे**
> सभापती, बाजार समिती, अचलपूर.




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अचलपूर :** स्थानिक बाजार समितीमध्ये १ कोटी ३५ लाख रूपयांचा अपहार झाल्याचे स्पष्ट झाले आहे. आजपर्यंतच्या घोटाळ्यांपैकी हा इतिहासातील सर्वात मोठा आर्थिक अपहार असल्याचे बोलले जात आहे. सन २०२३– २४ या आर्थिक वर्षातील नियमित वार्षिक अंकेक्षण पूर्ण झाले असून ऑडिट रिपोर्टची प्रत बाजार समितीला नुकतीच प्राप्त झाली आहे. जिल्हा विशेष लेखापरीक्षक (सहकारी संस्था) जे. आर. गवळे यांनी सदर लेखापरीक्षण केले आहे.

बाजारसमितीमध्ये सभापतीपद रिक्त झाल्याने पदाचा कारभार बघण्यासाठी एस. टी. केदार यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. बाजारसमितीमध्ये मोठ्या प्रमाणात बांधकाम करण्यात आले होते. २०२३ मध्ये बांधकाम कंत्राटदाराला नियमबाह्यपणे देयक अदा केल्याचा ठपका अंकेक्षण आला ठेवण्यात अहवालात आहे. बांधकाम कंत्राटदाराला रनिंग देयक देण्यापूर्वी आर्किटेक्टरची शिफारस घ्यावी लागते; मात्र सदर शिफारस न घेताच बांधकाम कंत्राटदाराला देयक अदा करण्यात आले असल्याचे अहवालात म्हटले आहे. सदर रक्कम लेखापरीक्षकांनी वसूलपात्र ठरविली आहे.

दरम्यानच्या काळात कोणत्याही प्रकारचे धोरणात्मक निर्णय घेता येत नसताना सुध्दा प्रशासक यांनी धोरणात्मक निर्णय घेतले. त्यामुळे बाजारसमितीचे लाखोंचे आर्थिक नुकसान झाले आहे. आर्किटेक्टरची शिफारस न घेता कंत्राटदाराला बांधकाम खर्चाची रक्कम देऊन नियमांचे उल्लंघन करण्यात आले आहे. दरम्यानच्या कालावधीत बऱ्याच प्रमाणात रकमा खर्च केल्या गेल्याआहेत.

या बाबींवरही अंकेक्षण अहवालात बोट ठेवण्यात आले आहे. बांधकाम कंत्राटदाराला अदा केलेल्या देयकांसोबत अन्य रकमा व्हाऊचरद्वारे काढण्यात आल्या आहेत. सदर कालावधीतील नियमित अंकेक्षण करण्यात आले. प्रशासक काळात निश्चितच काही घबाड सापडेल, असा अंदाज होता. त्या अनुषंगाने अंकेक्षण अहवालात सदर कालावधीतील खर्च रकमांचे वास्तव उजेडात आणले आहे. बाजारसमितील ऑडिट नोटची बऱ्याच दिवसांपासून प्रतीक्षा होती. नुकतीच ऑडिट नोट बाजारसमितीला अधिकृतरित्या उपलब्ध झाली आहे. एकाच आर्थिक वर्षात एवढ्या मोठ्याप्रमाणात झालेला आर्थिक अपहार पाहून अनेकांचे डोळे विस्फारले आहे.

# सात ग्रा.पं.ना ‘ग्रामपंचायत कार्यालय इमारत व नागरी सुविधा केंद्र’ निर्माणकरिता शासनाची मंजुरी

## आ. राजेश वानखडे यांच्या प्रयत्नांना यश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४तिवसा** – पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियानांतर्गत सन २०२५-२६ वार्षिक आराखड्यानुसार तिवसा विधानसभा मतदारसंघातील सात ग्रामपंचायतींना नवीन ग्रामपंचायत इमारत व नागरी सुविधा केंद्र खोली बांधकामाकरिता राज्य सरकारने मंजुरी दिलेली असून आता या ग्रामपंचायतीना आपले हक्काचे नवीन ग्रामपंचायत भवन मिळणार आहेत.

केंद्रशासनाने पंचायतीराज व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी पंचायत सशक्तीकरण अभियान या योजनेचे पुनर्गठन करून राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान ही योजना मूळ योजनेवा ढाचान बदलता सन २०२२-२३ पासून पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान ही योजना ग्राम विकास विभागाव्या अंतर्गत राबविण्यास प्रारंभ करण्यात आला होता.सदर योजना केंद्र शासन पुरस्कृत असून या योजनेत केंद्राचा हिस्सा ६० टक्के व राज्याचा हिस्सा ४० टल्के असणारआहे. सन २०२५-२६ करिता पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान योजनेसाठी शासनाने ३२४ कोटी रुपयाच्या निधीला नुकतीच मजुरात दिलेली आहे यामध्ये ग्रामपचायतीचे दैनंदिन कामकाज सुलभ होण्यासाठी संसदीय समितीच्या सूचनानुसार प्रामपंचायतीना पायाभूत सुविधा घटकांतर्गत नवीन ग्रामपंचायत कार्यालय इमारतत्यासोबत नागरी सुविधा केंद्र खोली मंजूर करण्याकरिता हा निधी मंजूर करण्यात आलेला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात आराखड्यातील एकूण ५००



ग्रामपंचायतींना या योजनेच्या अंतर्गत मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.या योजनेंतर्गत अमरावती जिल्ह्यातील एकूण २१ ग्रामपंचायतींना उपरोक्त निधी मिळणार असून त्यापैकी सात ग्रामपंचायती या एकट्या तिवसा विधानसभा मतदारसंघातील प्रयत्नपूर्वक मंजूर करून घेण्यात आ. राजेश वानखडे यांना यश आलेले आहे. यामध्ये तिवसा विधानसभा मतदारसंघातील तिवसा तालुक्यातील वाठोडा खुर्द, मुर्तीजापूरतरोडा, मार्डी, वरुडा, निभोरा, देलवाडी, फत्तेपूर जावरा, तसेच मोर्शी तालुक्यातील नेरपिंगळाई या ग्रामपंचायतीचा प्रामुख्याने समावेश आहे. यासह राज्यस्तरावरील स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे मातोश्री ग्रामपंचायत भवन उभारणी योजनेतर्गत तिवसा विधानसभा मतदारसंघातील अन्य दहा ग्रामपंचायतीचे प्रस्तावसुद्धा मंजुरीच्या प्रक्रियेत असून टप्याटप्याने मतदारसंघातील ज्या प्रामपंचायतीना हक्काचे कार्यालय नाही किंवा ज्या ग्रामपंचायतीच्या इमारती जीर्ण मोडकळीस आले आहेत. त्यांना हा निधी मिळेल.

# बनावट काटापट्टी प्रकरण :
# अडत्याचा परवाना रद्द !

## अडत्या शंकर गांधी यांना बाजारसमिती आवारात एक वर्ष प्रवेशबंदी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४धामणगाव रेल्वेः** कृषी उत्पन्न बाजारसमितीच्या खरेदी-विक्री व्यवहारात बनावट काटापट्टीचा वापर करून करणाऱ्या गुरुमाऊली ट्रेडर्सची अनुज्ञप्ती परवाना रद्द करण्यात आला असून सदर प्रकरणी अडत्या शंकर तुळशीराम गांधी यांना बाजारसमिती आवारात वर्षापर्यंत एक प्रवेशबंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे अडते व व्यापारीवर्गात खळबळ उडाली आहे. शेतमाल खरेदी-विक्री व्यवहारात बनावट काटापट्टीचा वापर करून कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पारदर्शी प्रशासनाला सुरुंग लावला जात असल्याचा वृत्त प्रकाशित होताच. मे महिन्यात घडलेल्या या गैरव्यवहार प्रकरणाची गंभीर दखल घेतल्याने शेतकरी श्यामसुंदर पनपालिया यांच्या विक्री व्यवहारात सौदापट्टी, हिशोबपट्टी, बिलबुक, बनावट काटापट्टीवर बाजार भावात खोडातोड व तसेच हिशोबपट्टी बुकामधून पावत्यांची फेरबदल केल्याप्रकरणी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने गुरुमाऊली ट्रेडर्सच्या शंकर तुळशीराम गांधी यांना कारणे दाखवा’ नोटीस बजावल्याचे सुद्धा उघडकीस आले. सदर प्रकरणात बाजारसमितीचे निरीक्षक दिनेश गोमासे यांच्या तपासणी अहवालात २६ में २०२५ रोजीचे श्यामसुंदर पनपालिया या शेतकऱ्यानी चणा विक्री व्यवहारात सौदापट्टी, हिशोबपट्टी, बिलबुक काटापट्टी वबनावट काटापट्टीवर बाजार भावात खोडतोड करुन फेरबदल केल्याचे व हिशोबपटटी बुकामधून पावती क्र. २८८ गायब करुन त्याच शेतकऱ्यास ३१ मे २०२५ नंतर २६ मे २०२५ रोजीची पावती क्र. २९४ वर हिशोब सादर केला असल्याने अडत्या शंकर गांधी यांनी बनावट काटापट्टी वापरून बाजार भावात खोडतोड केल्याचे निरीक्षण अहवालात स्पष्ट झाले आहे.सदर बाब गंभीर स्वरुपाची दखलपात्र असल्याने संचालक मंडळाने बाजारसमिती कायद्यांच्या अधिन राहून गुरुमाऊली ट्रेडर्सची अनुज्ञप्ती (परवाना) कायम रद्द केला असून अडत्या शंकर तुळशीराम गांधी यांना बाजार समिती आवारात एक वर्षापर्यंत प्रवेशबंदी घालण्यात आली आहे.सदर प्रकरणी अनुज्ञप्ती कायम रद्द व एक वर्षापर्यंत प्रवेश बंदीची कारवाई बाजारसमितीच्या इतिहासातील राज्यातील पहिलीच कारवाई असल्याचे बोलले जात असून सदर प्रकरणात मोठे खुलासे होण्याची शक्यता नाकारता येणार नाही, हे येथे उल्लेखनीय बाब आहे.

> महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ८ नुसार संचालक मंडळाने निर्णय घेऊन संबंधितावर कारवाई करण्यात आली आहे.
> **प्रवीण वानखडे.** सचिव कृ. उ. बा. स. धामणगाव रेल्वे-

# जिल्ह्यात तीन मंडळांत अतिवृष्टी; ४३१ हेक्टरवर पिकांचे नुकसान

## जिल्ह्यात मात्र इतरत्र समाधानकारक पाऊस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती** – जिल्ह्यात १३ दिवसांच्या खंडानंतर मंगळवारी २२ जुलैला पावसाने दमदार हजेरी लावली. मोर्शी, शिरखेड व नेर पिंगळाई या तीन मंडळांना तर अतिवृष्टीचा जबर फटका बसला. या अतिवृष्टीमुळे ३ मंडळातील ४३१ हेक्टर जमिनीवरील पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज कृषी विभागाने नोंदवला असून, नुकसानीचे सर्वेक्षण केले जाणार आहे.

मोर्शी तालुक्यात अतिवृष्टीमुळे दोन घरांची पडझड झाली. जिल्ह्यातील इतर काही तालुक्यांत झालेला पाऊस हा पिकांसाठी नवसंजीवनी देणारा ठरला . मोर्शी मंडळात १०९८ मि.मी., शिरखेड मंडळात ६५ मि.मी. तर नेर पिंगळाई मंडळात



७३८ मि.मी. मुसळधार पावसाची नोंद झाली. मोर्शी मंडळातील आखतवाड्यात तर पुरजन्य स्थिती निर्माण झाली होती. काही घरांमध्येही पाणी शिरल्याच्या घटना घडल्या. त्यामुळे नागरिकांमध्ये तारांबळ उडाली होती. तहसील प्रशासनाने तत्काळ उपाययोजना सुरू केल्या. अतिवृष्टीमुळे तिन्ही मंडळामध्ये रस्त्यांवरून पाण्याचे लोट वाहत होते. तिन्ही मंडळांमध्ये मुसळधार पावसामुळे काही वेळ जनजीवन विस्कळीत झाले होते.

इतर काही तालुक्यांमध्येही मध्यम ते – तुरळक पाऊस झाला. त्यामुळे माना टाकण्याच्या स्थितीत असलेल्या पिकांना नवसंजीवनी मिळाली असून, पुन्हा पिके तरली आहेत. अन्यथा दुबार पेरणीची वेळ येते की, काय अशी चिंता शेतकऱ्यांना लागून राहिली.

# मद्यपी हेड कॉस्टेबलचा मुख्यालयात धुमाकूळ प्रचंड आरडाओरड, अश्लिल भाषेत शिविगाळ

## आरपीआयने पकडून दिले गाडगेनगर पोलिसांच्या ताब्यात

### गुन्हे दाखल होताच कॉस्टेबलचे निलंबन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती–** ग्रामीण पोलिस मुख्यालयातील हेड कॉन्स्टेबल संजय गणपत मोहप (ब.नं १०८०) याने अतिशय मद्यधुंद अवस्थेत मुख्यालयात प्रचंड आरडाओरड करत सहकाऱ्यांना शिवीगाळ व गोंधळ घातल्याने ग्रामीण पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

हेड कॉस्टेबलची अरेरावी डोक्यावर गेल्याने आरपीआयने त्याला पकडून गाडगेनगर पोलिसांच्या ताब्यात दिले. त्यानुसार गाडगेनगर पोलिसांनी सदर हेड कॉस्टेबलवर गुन्हे दाखल केले आहे. याप्रकरणीगाडगेनगर पोलिसांचा स्पेशल रिपोर्ट आल्यानंतर एसीपी विशाल आनंद यांनी कॉस्टेबललानिलंबीत करून त्याच्या विभागीय चौकशीचे आदेश दिले आहे. माहितीनुसार, संजय मोहप-हा२२ जुलै रोजी रात्री अत्यंत मद्यधुंद अवस्थेत पोलिस मुख्यालयात कर्तव्यावर हजर झाला. त्यानंतर त्याने मोठमोठ्याने आरडाओरड सुरू केली आणि सहकाऱ्यांशी गैरवर्तन करत शिवीगाळ केली. या प्रकारामुळे मुख्यालयातील इतर पोलिस कर्मचाऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले होते.

मुख्यालयाचे राखीव पोलीस निरीक्षक अमरलाल सोमा उईके यांनी तत्काळ हस्तक्षेप करत संजय मोहपला ताब्यात घेत गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या स्वाधीन केले. त्यानंतर त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तपासणीत त्याने – मोठ्या प्रमाणात मद्यसेवन केल्याचेनिष्पन्न झाले. गाडगेनगर पोलिसांनी संजय मोहपविरुद्ध संबंधित कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. तसेच या घटनेचा सविस्तर स्पेशल रिपोर्ट पोलीस अधीक्षक विशाल यांच्याकडे पाठविण्यात आला.

आनंद त्यानंतर एसपी विशाल आनंद यांनी गंभीर दखल घेत संजय मोहपला पुढील आदेशापर्यंत तात्काळ निलंबित केले. त्यासोबतच होम डिवायएसपींकडे संजय मोहप यांची विभागीय चौकशी करण्याची जवाबदारी दिली. विभागीय चौकशीनंतर संजय मोहपवरपुढील शिस्तभंगात्मक कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.–

# संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता स्पर्धेमध्ये घुईखेड ग्रा. पं.जिल्ह्यात प्रथम, विभागातून चवथी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४चांदूर रेल्वेः** – संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान स्पर्धा २०२४-२५ मध्ये चांदूररेल्वे तालुक्यातील घुईखेड ग्रामपंचायतने चांदूररेल्वे तालुक्यातून अब्बल स्थान मिळवून अमरावती जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकाविला आहे, तसेच अमरावती विभागीय स्तरावरुन चवथा क्रमांक मिळालेला आहे.




यापूर्वी घुईखेड ग्रामपंचायतने संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान स्पर्धेअंतर्गत सन २०२३-२४ मध्ये तालुक्यातून प्रथम व जिल्ह्यातून तृतीय क्रमांक मिळाला होता. जिल्हाधिकारी कार्यालयात भव्य समारंभात राज्याचे महसूलमंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याहस्ते गावाला प्रथम व तृतीय क्रमांकाचे पारीतोषिक, सन्मानधिन्ह व बक्षिसाचा धनादेश अदा करण्यात आले.

या विशेष समारंभाला खा. डॉ. अनिल बोंडे, आ. संजय खोडके,जिल्हा पाणी व स्वचाता मिशन कस जिल्हा परिषदसंत गाडगेवाचा साम स्वच्छता अभियानजिल्हा स्तरीय पुरस्कार वितरण सोहळाआ. केवलराम काळे, आ. राजेश वानखडे, आ. गजानन लवटे, आ. प्रवीण तायडे, माजी पालकमंत्री प्रवीण पोटे, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारीसंजिता मोहपात्रा, अमरावती महापालिकेच्या आयुक्त सौम्या चांडक उपस्थित होते. या कार्यक्रमात घुईखेड प्रा.पं.च्या सरपंचा वर्षलता जाधव यांना प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह तसेच ६ लक्ष व ३ लक्ष रुपयांचा धनादेश देवून गौरविण्यात आले. त्यांच्या नेतृत्वाखाली गावाने स्वच्छता, पर्यावरण, कचरा व्यवस्थापन व सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली.

या गौरवप्रसंगी स्थानिक सहायक गटविकास अधिकारी संजय खारकर, तालुका गटसमन्वय स्वच्छ भारत मिशन राहुल गवई, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रियका निकोसे, आरोग्य विस्तार अधिकारी विमल मारबदे, प्रा.आ. केंद्र घुईखेड येथिल वैद्यकीय अधिकरी डॉ. मुद्रे, सहा. शिक्षक महेंद्र कोल्हे, ग्रामविकास अधिकारी विलास बिरे, ग्रामपंचायत अधिकारी धर्मेंद्र ठाकरे, सरपंचा वर्षलता जाधव, उपसरपंच, अनिल वानखडे, प्रा.प.सदस्य सचिन गुल्हाणेआशिष दाणी, लहानू मेश्राम, विवेक काकडे, संगीता गिरुळकर, जयश्री इंगोले, शारदा कुळडकार, पूजा पवार, अर्चना शिलनकर, गाव तंटामुक्ती अध्यक्ष शरद गुल्हाणे, संगणक परिचालक अजय तंवर, रोजगार सेवक किशोर क्षीरसागर, ग्रा.पं. कर्मचारी प्रभाकर जुनघरे, महेंद्र काकडे, घनश्याम नंदरधने, आशासेविका साधना जोशी, अंजली पाचखेडे, वैशाली गावंडे, संजवनी शिलणकर, अगणवाडी सेविका राजेश्वरी अंबुलकर, बाजारसमिती संचालक आशुतोष गुल्हाणे, माजीप. स. सभापती डॉ. हेमंत जाधव, सोसायटीचे माजी अध्यक्ष शेख अबीरभाई यांच्यासह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होत

# जिल्हा बँकेचे नोटीस प्रकरण क्लोज, अंतिम निर्णयाकडे लक्ष

## जिल्हा बँक : संचालक काळे अपात्रतेवर २९ ला सुनावणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती–** जिल्हा मध्यवर्ती बँकेत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये सुरू असलेल्या संघर्षात एक महत्त्वाचे वळण आले आहे. दंडाची नोटीस बजावण्याच्या प्रकरणात आदेशाकरिता न्यायालयाने सदर प्रकरण क्लोज केले असून, याप्रकरणी अंतिम निर्णय मात्र राखून ठेवला आहे. याशिवाय बँकेचे संचालक आनंद काळे यांच्या अपात्रतेप्रकरणी येत्या २९ जुलैला सुनावणी होणार आहे. त्यामुळे आता नोटीस प्रकरणात सर्वांचे लक्ष न्यायालयाच्या अंतिम निर्णयाकडे लागले आहे.बँकेतील विरोधी संचालकांनीसत्ताधाऱ्यांविरोधात



केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने विभागीय सहनिबंधक कार्यालयाने चौकशी समितीची स्थापना केली होती. या समितीसाठी जिल्हा बँकेने आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून न दिल्यामुळे बँकेला नोटीस बजावली होती, तसेच कागदपत्रे सादर करेपर्यंत दंड ठोठावला होता.बँकेने मात्र याविरोधात न्यायालयात धाव घेतली होती. यासंदर्भात दोन वेळा सुनावणी पार पडली असून, मंगळवार, २२ जुलै रोजी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने सदर प्रकरण प्राथमिकस्वरूपात आदेशासाठी बंद केल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, बँकेचे संचालक आनंद काळे यांच्यावर विविध प्रकरणांमध्ये अनियमितता केल्याचा आरोप ठेवत त्यांना अपात्र ठरविण्याची नोटीस बजावली आहे.

# सावध शिक्षिकेमुळे अश्लील चाळ्याचा प्रकार उघड

**दुसऱ्याचा कसून शोध सुरू**

## शाळकरी मुलींना इशारे करणारा ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती–** शालेय मार्गावर ६ विद्यार्थिनींना अश्लील इशारे करणाऱ्या दोघा अज्ञात व्यक्तींविरोधात गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, यातील एक आरोपीला पोलिसांनी तात्काळ ताब्यात घेतले आहे. दुसऱ्या आरोपीचाशोध सुरू आहे. हा घटनेचा प्रकार सावध आणि तत्पर शिक्षिकेच्या सजगतेमुळे उघड झाला आहे.माहितीनुसार, गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या एका माध्यमिक कन्या शाळेत शिकणाऱ्या सहा विद्यार्थिनी ट्यूशनवरून शाळेत येत असताना शाळेजवळील झुडपात लपून उभ्या असलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी त्यांना आवाज देत अश्लील इशारे केले. इतकेच नव्हे तर त्यांनी स्वतःचे गुप्तांग दाखवून त्या विद्यार्थिनींना जवळ बोलावण्याचा प्रयत्न केला. या प्रकारामुळे भयभीत झालेल्या मुलींनी तत्काळ घटनास्थळा वरून पळ घेतला आणि शाळेत आपल्या एका पोहोचून शिक्षिकेला सर्व प्रकार सांगितला. शिक्षिकेने सजगता दाखवत इतर सहकाऱ्यांना माहिती दिली व संबंधित ठिकाणी धाव घेतली. त्यावेळी दोघांपैकी एक व्यक्ती घटनास्थळीच आढळून आले. त्यापैकी एकाला पकडून गाडगेनगर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. याबाबत पोलिसांनी एकावर गुन्हे दाखल करून दुसऱ्या आरोपीचा शोध सुरू केला. शाळेच्या परिसरात किंवा रस्त्यांवर संशयास्पद हालचाली दिसल्यास तात्काळ पोलिसांना कळवावे, जेणेकरून अशा गंभीर घटनांना प्रतिबंध घालता येईल.

# बंदीनंतरही शहरात प्लास्टिकचा खुलेआम वापर !

## नियमित कठोर कारवाईची गरज, शहरात फोफावतोय प्लास्टिकचा भस्मासूर

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२४चांदूर बाजार** –केंद्र सरकारने एकेरी वापरातील प्लास्टिकच्या उत्पादन, आयात, साठवण, वितरण, विक्री आणि वापरावर बंदी घातली. कोणत्याही दुकानात प्लास्टिक पिशवी आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा निर्णय केंद्र सरकारने घेतला; मात्र अद्यापही बाजारात एकेरी वापराच्या प्लास्टिकच्या पिशव्या खुलेआम वापरात आणल्या जात आहेत. नियमित कारवाई होत नसल्यामुळे हा कारभार सुरु असल्याची दिसून येत आहे.

पर्यावरणाचा समतोल राखणे आणि प्रदूषण रोखणे, या दृष्टिकोनातून राज्य सरकारने २०१८ ला महाराष्ट्रात प्लास्टिकबंदीचा निर्णय झाला. तेव्हा टप्प्या-टप्प्याने ती लागू करण्यात येणारहोती. मात्रगत ४ वर्षात या बंदीचे टप्पे केव्हा आले आणि केव्हा गेले, हे कळालेच नाही, ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिकवर बंदी असतानात्याच प्लास्टिकवर ५१ मायक्रॉनचा शिक्का मारत ते बाजारात आणले गेले या पिशव्यांची जाड़ी तपासण्याची जबाबदारी प्रदूषण नियंत्रण मंडळावर होतीः मात्र मंडळाने ही जबाबदारी कधीच पाडली पार नसल्याचेनागरिकांच्या चर्चेवरून दिसून येत असल्याने त्यामुळे




आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.३ जुलै हा दिवस प्लास्टिकमुक्ती दिवस म्हणून साजरा केला गेला. मात्र दिवस फक्त साजरा करण्यापुरताच राहिल्याचे शहर आणि ग्रामीण भागातील स्थितीवरून दिसून येते. शहरात प्लास्टिक बंदी खरोखरच आहे का? असा प्रश्न आता पडत आहे. शहरच नव्हे तर संपूर्ण तालुक्यात प्लास्टिक कचरा जमा होत आहे. केंद्र सरकारच्या निर्णयानंतर काही काळ नगरपालिका यांनी कारवायाही केल्याः मात्र त्यानंतर ते पथक गारठल्याने शहरातील दुकानांत खुलेआम प्लास्टिकचा वापर होत आहे त्यामुळे नुसता बंदी दिवस साजरा करण्यात अर्थ काय? असा सवाल उपस्थित होत आहे..

> शहरात जनजागृतीच नाही, केंद्र सरकारतर्फे प्लास्टिक ठापरावर बंदी घालण्यात आली. यासाठी चांदुर बाजार शहरात जनजागृती करणे आवश्यक आहे. मात्र नगर परिषदेतर्फे प्लास्टिक बंदीबाबत अद्याप पाहिजे त्या प्रमाणात जनजागृती करण्यात आलेली नाही त्यामुळे शहरात संपूर्ण प्लास्टिक बंदी अद्यापही झाली नसल्याने आठवडी बाजारात तर मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पिशव्यांचा वापर होत असल्याचे दिसून येत आहे.

# यंदा ज्वारीचा पेरा पडला मागे नगदी पिकांकडे शेतकऱ्यांचा कल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

सातत्याने नुकसान,उत्पादनात घट, न मिळणारा भाव, वन्यप्राण्यांकडून होणारे नुकसान यामुळे अलीकडे ज्वारीच्या पेऱ्यात सातत्याने कमी येत आहे. यंदाच्या खरिपात जिल्ह्यात फक्त ४५१९ हेक्टरमध्ये ज्वारीचे पेरणीक्षेत्र आहे. त्यातुलनेत कपाशी, तूर, सोयाबीन व मका या पिकांची क्षेत्रवाढ होत आहे.

शेतकऱ्यांचा कल खरीप पिकांकडे असला तरी यामध्ये पीक पॅटर्न आता बदलू लागला आहे. यावर्षी ज्वारीचे क्षेत्रात कमी होऊन ५० हजार हेक्टरवर मक्याची लागवड करण्यात आलेली आहे. ज्वारीला काढणीच्या हंगामात पावसामुळे मोठे नुकसान होत असल्याने शेतकरी आता पर्याय शोधत आहे.अशा परिस्थितीत मक्याचे उत्पादन वाढत आहे. गुरांना चारादेखील उपलब्ध होत आहे. शिवाय मल्याला मागणी असल्याने बाजारपेठही उपलब्ध असल्याचा फटका खरिपात ज्वारीला बसला आहे. ज्वारीचे क्षेत्र कमी झाल्याने त्याऐवजी मका व अन्य पिकांची क्षेत्रवाढ होत आहे. जिल्ह्यात रब्बी हंगामात ज्वारीचे क्षेत्र वाढत असल्याचे वास्तव आहे.



**ज्वारीचा पेरा घटला मक्याचा वाढला**

ज्यारी पिकासाठी १२ हजार हेक्टर क्षेत्र यंदा प्रस्तावित होते. तुलनेत ५ हजार हेक्टर क्षेत्रात पेरणी झालेली आहे. तर मक्यासाठी २० हजार हेक्टर क्षेत्र प्रस्तावित असताना ५१ हजार हेक्टर क्षेत्रात पेरणी झाली.

**शासकीय खरेदीवरच मदार**


आधारभूत किमतीने नाफेडमार्फत ज्वारीची खरेदी झाल्यासच ज्वारीला भाव मिळतो. अन्यथा शेतकऱ्यांना बाजार समिती व खासगी बाजारात दोन हजार रुपये क्विंटलने ज्वारी विकावी लागते हे दुर्देवच म्हणावे लागेल.

# १९६ कोटींचा मालमत्ताकर थकीत; अडीच हजार मालमत्ताधारकांवर एक लाखापेक्षा अधिक थकबाकी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

महापालिका क्षेत्रातील मालमत्ताधारकांकडे तब्बल १९६ कोटी रूपये थकीत असून, यामध्ये काही मालमत्ताधारकांकडे तर तीन ते चार वर्षांपासूनची थकबाकी आहे. त्यामुळे आता अशा सर्वच थकबाकोदार मालमत्ताधारक महापालिकेच्या रडारवर असून, आयुक्त सौम्या शर्मा यांनी त्याबाबत स्पष्टपणे निर्देश दिले आहे.

महापालिका क्षेत्रात इमारती व खुले भूखंड अशा एकूण तीन लाख मालमता आहेत. महापालिकेच्या वाढीव दराला स्थगिती मिळाल्यावर २०२४-२५ पासून जुन्याच दराने मालमत्ता कर लागू झाला आहे; परंतु तरीही अद्याप मोठ्या प्रमाणात मालमत्ताधारकांकडे कराची बकवाकी आहे. गतवर्षीपर्यंतची १९६ कोटींची थकबाकी तसेच २०२५-२६ वा चालू वपांतील ९५ कोटींची



मागणी, अशाप्रकारे मालमत्ता कराची एकूण २९१ कोटी रुपयांची मागणी निश्चित झाली आहे. एकीकडे महापालिकेचागाडा हाकताना आयुक्त व विभागप्रमुखांना तारेवरची कसरत करावी लागत असताना, दुसरीकडे मोठ्या मालमत्ताधारकांकडे कोट्यवधी रूपयांचा कर थकीत आहे. त्यामुळे स्वच्छ्ता, अतिक्रमण आदी विषयानंतर आता आयुक्तांनी मालमत्ताधारकांकडे मोर्चा वळविला आहे. आतापर्यंत केवळ नियमित करवसुली करण्यासह नोटीस देण्याची अंमलबजावणी कर विभागाकडूनच केली जात होती; मात्र आता साहाय्यक संचालक नगररचना विभागालाही संयुक्तपणे कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.सुमारे अडीच हजार मालमताधारकांवर एक लाख रूपयांपेक्षा अधिक, तर १२ हजार मालमत्ताधारकांवर २५ हजारांपेक्षा अधिक कर थकीत आहे. त्यामुळे २ थकबाकीदार मालमत्ताधारकांना जप्त नोटीस देणे, त्यानंतर जप्तीची नोट देण्यासह अतिरिक्त बांधकाम आढळल्यान दंड आकारणे, आदी प्रक्रिया राबविण्याचे आदेश आयुक्तांनी दिले असल्याची माहिती उपायुक्त नरेंद्र वानखडे यांनी दिली.

# बडनेरात शनिवारी पाणीपुरवठा बंद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

बडनेरा येथील नवीवस्तीभागातील पाण्याच्या टाकीच्या आऊटलेटला गळती लागली असून, त्यामुळे त्याच्या दुरुस्तीचे काम शनिवार, २६ जुलै रोजी हाती घेण्यात येणार आहे. परिणामी, त्या दिवशी सदर भागात पाणी पुरवठा होणार नाही. पाणीपुरवठा एक दिवस आड होत असल्याने या भागातील पाणीपुरवठा २८ जुलै रोजी पूर्ववत होईल. त्यामुळे संबंधित भागातील नागरिकांनी पाणी जपून वापरावे व आवश्यक तेवढा पाण्याचा साठा करून ठेवावा, असे आवाहन संजय लेवरकर (उपविभागीय अभियंता, मजीप्रा) यांनी केले आहे.

# विद्यापीठाची आचार्य पदवी पूर्व परीक्षा-२०२५; २३ व २४ ऑगस्ट रोजी होणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची आचार्य पदवी पूर्व परीक्षा-२०२५ दि. २३ व २४ ऑगस्ट, २०२५ रोजी घेण्यात येणार आहे. प्रवेशपत्रे व परीक्षेचा निकाल प्रवेशित विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वत:च्या लॉगीन आय.डी. वर पाठविण्यात येईल, असे विद्यापीठाच्या आचार्य कक्षाकडून अधिसूचनेव्दारे कळविण्यात आले आहे.

ज्या आवेदकांनी आवेदनपत्रे पी.जी. चा विषय सोडून इतर विषयांत भरले असतील असे, व ज्या आवेदकांचे ई.डब्ल्यू.एस./एन.सी.एल. ची मुदत दि. ३१




मार्च, २०२५ रोजी संपली असेल, अशा आवेदकांचे अर्ज पुनरावलोकनार्थमध्ये ठेवण्यात आले आहेत. अशा विद्यार्थ्यांना कार्यवाहीबाबतची सूचना त्यांच्या ई-मेल आय.डी. तसेच त्यांच्या मोबाईलवर संदेशाव्दारे आचार्य कक्षाकडून पाठविण्यात येईल.

तरी सर्वसंबंधितांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता आचार्य कक्षाच्या उपकुलसचिव सौ. मिनल मालधुरे यांचेशी प्रत्यक्ष वा मो. क्र. ९०११०९०४४७ वर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

# जिल्हा परिषदेच्या साऊर सर्कलचे नाव बदलल्याने आक्षेप

## श्रीकांत बोंडे यांची तहसीलदारांकडे तक्रार : साऊरचे नाव गट म्हणून कायम ठेवण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४टाकरखेडा संभू :**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पाश्र्वभूमीवर भातकुली तालुक्यातील साकर जि.प. सर्कलचे नाव बदलून खारतळेगाव असे करण्यात आले आहे. या प्रस्तावित बदलावर हरकत दाखल करण्यात आली आहे. यासंदर्भात भातकुली तालुक्याचे काँग्रेसचेअध्यक्ष श्रीकांत बोंडे यांच्या नेतृत्वात ग्रामस्थांनी तहसीलदार व जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन असून, साऊर नाव कायम ठेवण्याची मागणी केली आहे.

२०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी साऊर सर्कलमधील गावांचा समावेश पूर्वीपासून साऊर या नावाने होत




आहे. मात्र, प्रशासनाने साऊर सर्कलचे नाव बदलून खारतळेगाव सर्कल असे करण्याचा निर्णय घेतला तो योग्य नसल्याचे मत श्रीकांत बोंडे यांनी व्यक्त केले आहे. साऊर ग्रामपंचायत क्षेत्राची रसूल्लापूर व कळमगव्हाण गावासह ४६९२ तर खारतळेगाव ४१०४ इतकी लोकसंख्या आहे.तसेच साऊर येथे जिल्हा परिषद, प्राथमिक शाळा, ग्रामपंचायत कार्यालय व अन्य शासकीय सुविधा कार्यरत आहेत. त्यामुळे साऊर हे सर्कलचे मूळ व प्रस्थापित नाव असून त्याचे नाव बदलल्यास नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता आहे.साऊरचे नाव बदलण्यामुळे मतदार यादीतही गोंधळ निर्माण होऊ शकतो. त्यामुळे साऊर सर्कलचे नाव जैसे-थे ठेवावे, अशी मागणी श्रीकांत बोंडे, जयंत देशमुख, प्रदीप शेंडे, अभय वंजारी, नरेंद्र मकेसर, अभय देशमुख, दिनेश ठाकरे, अंकुश जुनघरे, वैकुंठ देशमुख यांनी या निवेदनातून केली आहे.

# वारकरी साहित्य परिषदेची आढावा बैठक

## महिला हरिपाठ संघासाठी सर्वेचे नियोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४धारणी**

वारकरी साहित्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष ह. भ.प. किशोर महाराज उगले तसेच जिला महिला अध्यक्ष यामिनी मेहरे यांच्या नेतृत्वात अमरावती येथील शशिनगर येथे नुकताच आढावा बैठक पार पहली. यावेळी धारणी येथील वारकरी मंडळांनी विठ्ठल नामाची शाळा भरली हे भजन सादर केले.संपर्कप्रमुख निकम यांच्या अध्यक्षतेखाली ही आढावा बैठक झाली. बैठकीपूर्वी दिंडी काढण्यात आली. या बैठकीत जिल्ह्यातील महिला हरिपाठ यांच्या स्पर्धेचे नियोजन करण्यात आले. या स्पर्धेत



जास्तीत जास्त संघाने सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक येणाऱ्या संघाला ऋषिकेश हरिद्वार, द्वितीयक्रमांकाच्या संघाला कन्याकुमारी, तृतीय क्रमांकासाठी जगन्नाथ पुरी, चौथ्या क्रमांकासाठी तिरुपती बालाजी, विशेष पुरस्कारासाठी मथुरा येथे महिलांची सहल पाठविण्यात येणार आहे.

जिल्हाध्यक्ष पुरुष व महिला मुंबईला २५ जुलै रोजी तसेच तालुकाध्यक्ष पुरुष, महिलाविश्वस्त पदाधिकारी यांनी येण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी अखंड ४५ वर्षे पायी वारी करणारे ह. भ. प. तुकाराम लंगोटे महाराज व त्यांच्या पत्नी ह.भ.प. कमला लंगोटे, समाजसेवक धीरूभाई सांगानी यांचा सत्कार करण्यात आला.

# मोबाईल नंबर अपडेट करा, वीजसेवेचे 'एसएमएस' मिळवा

## मराठी व इंग्रजीत सेवा, भाषा निवडीचे अधिकार ग्राहकांना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४ अमरावती**

वीजबिलाचा तपशील तसेच वीजपुरवठा बंद असण्याचा कालावधी व इतर माहिती 'एसएमएस'द्वारे मिळवण्यासाठी अमरावती परिमंडलातील साडेतेरा लाख ग्राहकांनी महावितरणकडे मोबाईल क्रमांक नोंदविला आहे. हे एसएमएस मराठी किंवा इंग्रजीत दिले जात असून, भाषा निवडीचे अधिकार ग्राहकांना आहेत.अमरावती परिमंडलात सर्व वर्गवारीतील एकूण १४ लाख ६२ हजार ५० वीजग्राहक आहेत. त्यापैकी ९२.३८ % ग्राहकांनी अर्थात १३ लाख ५० हजार ६३१ ग्राहकांनी महावितरणकडे मोबाईल क्रमांक




नोंदवलेला आहे. अमरावती जिल्ह्यातील ८ लाख ४२ हजार ४९४ ग्राहकांपैकी ७ लाख ४५ हजार १४ ग्राहकांनी तर यवतमाळ जिल्ह्यातील ६ लाख ४९ हजार ५५६ ग्राहकांपैकी ६ लाख ५ हजार ५१७ ग्राहकांनी महावितरणकडे मोबाईल क्रमांकाची नोंद केलेली आहे.नोंदणीकृत ग्राहकांना वीजबिलाची माहिती, तांत्रिक बिघाड किंवा नियोजित देखभाल व दुरुस्तीमुळे वाहिनीवरील बंद असलेला वीजपुरवठा पूर्ववत होण्याचा कालावधी, मीटर रीडिंग, बिल भरण्याची अंतिम तारीख ही माहिती त्यांच्या मोबाईल क्रमांकावर 'एसएमएस'द्वारे पाठवण्यात येत आहे.

निवडलेली भाषा बदलण्याचा पर्यायमहावितरणकडून ग्राहकांना मोबाईलवर पाठवले जाणारे संदेश मराठी किंवा इंग्रजी या भाषेत दिले जातात. त्यासाठी भाषा निवडीचे अधिकार ग्राहकांना आहेत. मोबाईल सेवेसाठी अर्ज करताना जी भाषा ग्राहकाने निवडली आहे, त्या भाषेत त्यांना संदेश जात असल्याचे महावितरणने कळवले आहे.

ग्राहकांना मराठी किंवा इंग्रजी या भाषेतून 'एसएमएस' मिळवण्याचा पर्याय आहे. त्यासाठी ग्राहकांना नोंदणी करताना मराठी किंवा इंग्रजी भाषा निवडता येते. ग्राहकाने यापूर्वी इंग्रजी वा मराठी भाषा निवडली असेल तरी ती भाषा बदलण्याचे स्वातंत्र्य ग्राहकास आहे. ग्राहक https://pro.mahadiscom.in/ConsumerInfo/consumer.jsp या थेट लिंकवर जाऊन भाषेचा पर्याय निवडू शकतात किंवा भाषा निवडीसाठी MLANG <12 अंकी ग्राहक क्रमांक M हा एसएमएस ९९३०३९९३०३ क्रमांकावर पाठवू शकतात. याशिवाय २४ तास सुरू असणाऱ्या कॉल सेंटरच्या टोल फ्री १९१२ किंवा १८००-२१२-३४३५ किंवा १८००-२३३-३४३५ या क्रमांकावर संपर्क साधून मोबाईल नोंदणी करून भाषा बदलता येते.

# राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी 'मेडिकल कॅशलेस' योजना लागू करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वैद्यकीय कॅशलेस योजनेचा लाभ मिळावा, यासाठी भारतीय जनता पक्ष शिक्षक आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष चंद्रशेखर भोयर यांनी मुख्यमंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले आहे.



भोयर यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, महाराष्ट्रातील अनेक शासकीय विभागांमध्ये वैद्यकीय कॅशलेस सुविधा लागू असून संबंधित कर्मचाऱ्यांना त्याचा लाभ मिळत आहे. मात्र, शिक्षण विभागातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ही सुविधा अद्यापही मिळालेली नाही. यामुळे या कर्मचाऱ्यांना गंभीर आजारांमध्ये खासगी रुग्णालयात उपचार करताना आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.

या गैरसोयीमुळे संबंधित कर्मचाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. शिवाय वैद्यकीय खर्च भरतानाच्या प्रक्रियेमुळे अनेकदा भ्रष्टाचारालाही खतपाणी घातले जात आहे. त्यामुळे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनाही तत्काळ वैद्यकीय कॅशलेस सुविधा मिळावी, अशी मागणी त्यांनी केली.या विषयाकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे व लवकरात लवकर योजना लागू करावी, असेही भोयर यांनी निवेदनाच्या माध्यमातून स्पष्ट केले आहे.

# शास्त्री महाराजांच्या मंदिरात चोरी चांदीच्या पादुकासहित दानपेटी केली रिकामी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अंजनसिंगी**

अंजनसिंगी येथील शास्त्री महाराजमंदिरात अज्ञात चोरट्याने चोरी करून चांदीच्या पादुकासह दानपेटीतील रक्कम चोरी केल्याची घटना मंगळवार २२ जुलैच्या रात्री घडली.

अंजनसिंगी येथे दरवर्षीप्रमाणे शास्त्री महाराज यांची पुण्यतिथी महोत्सव मोठ्या उत्साहात साजरी केल्या जाते. २२ जुलै रोजी पुण्यतिथी महोत्सव साजरा



करण्यात आला. रात्री पालखी काढून राममंदिरात पालखी ठेवण्यात आली व कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.या संधीचा फायदा घेत अज्ञात चोराने रात्री २ वाजताच्या सुमारास मंदिराचे कुलूप फोडून दानपेटी फोडली, तसेच काचेच्या चौकणातअसलेल्या चांदीच्या पादुका काचेचा चौघडा फोडून चोराने चोरून नेल्या.या पादुकांची अंदाजे किंमत २२ हजार तर दानपेटीतील जवळपास ७ ते ८ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. याप्रकरणी कुन्हा पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास कुन्हा पोलिस करीत आहे.

# कचरा टाकण्यास प्रतिबंध - रामपुरी कॅम्पमध्ये जनजागृती पेंटिंगद्वारे स्वच्छतेचा संदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

अमरावती महानगरपालिकेच्या उत्तर झोन क्र. १ अंतर्गत येणाऱ्या रामपुरी कॅम्प प्रभाग क्रमांक ३ मध्ये स्वच्छतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. नवसारी परिसरातील स्मशानभूमी लगत, नवसारी रोडवरील पावर हाउसजवळील भिंतीवर येथे कचरा टाकू नये या आशयाचे जनजागृतीपर पेंटिंग करण्यात आले आहे.




या उपक्रमाद्वारे नागरिकांना परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन करण्यात आले असून, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकल्यास महानगरपालिकेच्या नियमांनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही देण्यात आला आहे.

महानगरपालिका शहर स्वच्छ व सुंदर राखण्यासाठी विविध जनजागृती उपक्रम राबवत आहे. विशेषतः ज्या भागात वारंवार बेकायदेशीर कचरा टाकला जातो, अशा ठिकाणी अशा प्रकारची भित्तीचित्रे प्रभावी ठरत असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

हा उपक्रम केवळ सूचना देण्यापुरता मर्यादित न राहता, नागरिकांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण करतो आणि स्वच्छतेच्या चळवळीत त्यांचा सक्रिय सहभाग निश्चित करतो, असे मत स्थानिक नागरिकांनी व्यक्त केले आहे.

# राज्यभरात बच्चू कडू यांच्याकडून चक्का जाम आंदोलन

## शेतकरी, शेतमजूर, दिव्यांगांसाठी प्रहारचा एल्गार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अचलपूर**

शेतकरी कर्जमाफी, शेतमजूर, दिव्यांग आणि ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाने राज्यभरात चक्का जाम आंदोलन सुरू केलं आहे. अमरावती जिल्ह्यातील परत वाडा येथे आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली हजारो शेतकरी आणि कार्यकर्ते रस्त्यावर उतरले आहेत. शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा या मुख्य मागणीसाठी हे आंदोलन करण्यात आले आहे.




परत वाडा-अमरावती महामार्गावर टायर जाळून रास्ता रोको करण्यात आला. शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग, मच्छीमार, मेंढपाळ यांच्यासह विविध घटकांच्या न्याय्य हक्कांसाठी प्रहार संघटना सरकारविरोधात आक्रमक झाली आहे. बच्चू कडू यांनी सरकारवर टीका करत म्हणाले की, सरकारला राज्यात अशांतता हवी आहे. म्हणूनच कर्जमाफीचा निर्णय घेतला जात नाही.

**आता तारीख न सांगता मंत्रालयात घुसू!**

आपल्या भाषणात कडू यांनी रोष व्यक्त करत सांगितले की, आता तारीख न सांगता मंत्रालयात घुसू. समिती नेमली पण अध्यक्षाला माहिती नाही. आता गांधीगिरी संपली, भगतसिंग गिरी सुरू झाली आहे. आत्महत्या करण्याऐवजी लढा दिला पाहिजे. कृषिमंत्री विधानभवनात रमी खेळतायत आणि युवक रमी खेळून मरत आहेत. हे फक्त ट्रेलर आहे, पिक्चर अजून बाकी आहे!बच्चू कडू यांनी पुढील आंदोलनाची तारीखही जाहीर केली असून, २९ जुलै रोजी वसंतराव नाईक यांच्या समाधिस्थळी मोठं आंदोलन होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**मेळघाट मध्ये चक्काजाम आंदोलन न करता प्रहार ने काढला मोर्चा**

शेतकऱ्याच्या कर्जमाफी साठी आज प्रहार जनशक्ती पक्षाकडून संपूर्ण राज्यात चक्काजाम आंदोलन करण्यात आलं मात्र मेळघाट मध्ये प्रहार च्या वतीने चक्काजाम आंदोलन करण्यात आले मात्र यावेळी कार्यकर्त्यांनी कोणतीही गाडी थांबून चक्काजाम आंदोलन केले नाही तर शंभर लोकांचा मोर्चा लाऊड स्पीकर लावून बच्चू कडू चे समर्थक रमेश तोटे यांनी उपविभागीय कार्यालयावर नेला आणि निवेदन दिले.त्यामुळे मेळघाट च्या चक्काजाम ची सर्वत्र चर्चा व आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे.

# पिकवा, प्रक्रिया करा अन् पैसे कमवा : कृषी समृद्धीचे वरदान

## पीक योजनेत सुधारणा : शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक वाढविण्याची संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

जुन्या पीक योजनेत मोठ्याप्रमाणावर गैरप्रकार झाल्याचे उघडकीस आले आहे. या योजनेतील गैरकारभाराबाबत अनेक शेतकऱ्यांना नाराजी व्यक्त केली होती. त्यामुळे त्यात सुधारणा करून नवीन कृषी समृध्दी योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेऐवजी शेतकऱ्यांच्या विकासासाठी व शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक वाढवणारी नवी योजना सुरू करण्यात येत आहे.

'कृषी समृद्धी' योजनेंतर्गत शेतकऱ्यांना अल्प दरात विमाकवच देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांकडून खरिपासाठी २ टक्के, रब्बीसाठी १.५ टक्के आणि नव्या पिकांसाठी ५ टक्के इतकी आकारणी केली जाणार आहे. उर्वरित रक्कम राज्य सरकार भरणार आहे. या योजनेत विमा कंपनी बदलण्याऐवजी नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यावर भर आहे.या योजनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षा प्रदान करणे, कृषी उत्पादकता वाढवणे आणि शेती पद्धतींचे आधुनिकीकरण करणे हा आहे. जुन्या योजनेतील त्रुटी दूर करून शेतकऱ्यांना थेट लाभ मिळवून देण्याचा या योजनेतून केला जाईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. मात्र, याबाबत अद्यापपर्यंत कोणत्याही सूचना राज्य सरकारकडून आल्या नसल्याच्या सांगण्यात आले.




### बळीराजाला होणार फायदा

या योजनेच्या माध्यमातून बळीराजाला फायदा होणार आहे. या योजनेत भांडवली गुंतवणुकीवर अधिक भर देण्याचा प्रयत्न कृषी विभागाकडून करण्यात आला आहे.

### पारदर्शक ट्रिगर प्रणाली, प्रभावी अंमलबजावणी

'कृषी समृद्धी' योजनेत विमा कंपनी बदलण्याऐवजी नियमांची काटेकोर अंमलबजावणी व पारदर्शक ट्रिगर प्रणाली ठेवण्यात आली आहे. तसेच, राज्य सरकारची स्वतःची विमा कंपनी स्थापन करण्याचा कोणताही विचार नाही, असेही कृषी मंत्र्यांनी स्पष्ट केले.

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा ८६०५९४८८५३

# भिरोजा गावातील आदिवासी शेतकऱ्याची विहीर गेली चोरीला

## मेळघाटमधील रोहयोला भ्रष्टाचाराची कीड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४चिखलदरा**

मेळघाटच्या धारणी व चिखलदरा तालुक्यांत कोट्यवधींची मग्रारोहयो अंतर्गत कामे आता वादग्रस्त ठरली आहेत. धरमडोह ग्रामपंचायतीच्या बहाद्दरपूर येथील प्रकारानंतर चिखली ग्रामपंचायतीच्या भिरोजा गावात एका आदिवासी शेतकऱ्याच्या शेतातील विहीर खोदकाम दाखवून लाखो रुपये लाटले गेल्याचा धक्कादायक प्रकार पुढे आला आहे. त्यासंदर्भात बीडीओंना तक्रार देण्यात आली. एका आठवड्यात दुसरे प्रकरण पुढे आल्याने मेळघाटमध्ये रोहयोला भ्रष्टाचाराची कीड लागल्याचे आता समोर आले आहे.



**आपण पुण्याला काही शैक्षणिक कामानिमित्त गेलो असता, शेतात विहिरीकरिता २९ मजूर राबल्याचे व त्यावर तीन मस्टरद्वारे पैसे काढल्याची माहिती आहे. तथापि, माझ्या शेतात विहिरीचा पत्ताच नाही.**
**– तुळशीराम बेलकर शेतकरी, भिरोजा, ता. चिखलदरा.**

तुळशीराम भैयालाल बेलकर (रा. भिरोजा) असे विहीर चोरीला गेलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. तक्रारीनुसार, चिखली ग्रामपंचायतअंतर्गत ते राहत असले तरी मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीने ते पुण्याला कामाला आहेत. त्यादरम्यान त्यांच्या शेतात विहीर मंजूर करून त्यावर रोजगार हमी योजनेंतर्गत मजूर दाखविले गेले. या कामावर लाखो रुपये काढण्यात आल्याची तक्रार खंडविकास अधिकाऱ्यांना त्यांनी केली.

प्रत्यक्षात कुठल्याच प्रकारचे काम त्यांच्या शेतात झालेले नाही. त्यामुळे विहीर चोरीलाच गेली असून त्याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. संबंधितांवर कारवाई न झाल्यास बेमुदत उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

**चिखलीचे मजूर चार किलोमीटर गेले कामाला**

इकडे तुळशीराम बेलकर या शेतकऱ्याच्या शेतात विहिरीचा पत्ता नाही, तर दुसरीकडे चिखली येथील २९ मजूर चार किलोमीटर अंतरावर विहिरीच्या कामाला गेल्याचा अहवाल कागदोपत्री तयार करून पैसे लाटले गेल्याचा धक्कादायक प्रकार पुढे आला.

शेतात मजूर दाखवून तब्बल २९ लोकांनी तीन हजेरी पत्रकांवर हजेरी लावून मजुरी काढली व शासनाकडून मिळणारा लाभ हडपला. हे सर्व संगनमताने रोजगार सेवक, तांत्रिक, ग्रामसेवक व चेतन लक्ष्मीनारायण झाडकर यांनी केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

# रानभाज्या खा अन् स्वस्थ राहा, घनदाट जंगलात दडलाय 'खजिना'

## खाद्यप्रेमींकडून खरेदीला प्रतिसाद: ग्रामीण भागातील महिलांना मिळतोय चांगला रोजगार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

पावसाळा सुरू झाल्यावर रानभाज्यांचा हंगाम सुरू होतो. या दिवसांत बाजारपेठांमध्ये विविध प्रकारच्या रानभाज्यांची रेलचेल दिसून येते. सध्या जिल्ह्याच्या विविध बाजारपेठांमध्ये रानभाज्यांची आवक दिसून येत आहे. आरोग्यासाठी अत्यंत गुणकारी असलेल्या भाज्यांना खाद्यप्रेमींकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे.ग्रामीण भागातील जंगलातून रानभाज्यांची आवक तालुका मुख्यालय तसेच जिल्हा मुख्यालयातील बाजारपेठेत दिसून येत आहे. ग्रामीण भागातील नागरिक स्वतः रानातून या भाज्या आणतात व त्यांचे सेवन करतात.



त्या चतीने खाल्ल्या जात आहेत.बाजारात सध्या कडूभाजीला बरीच मागणी असल्याचे दिसून येते. ही भाजी खरेदी करण्यासाठी नागरिकांची लगबग दिसते. विशेष म्हणजे, पातूरची भाजीसुद्धा अनेक नागरिक आवडीने खातात.बाजारात सध्या मशरूम, कोयार, शेरडिरे, धानभाजी, पातूर, कडूभाजी, कानभाजी, केना, अरतफरी, हरतफरी, रानथोपा, कुकुर्डा, आंबाडी, खापरखुटी, तरोटा, लालमाट, शेवगा भाजी, मोठा चिचवा, लहान चिचवा, तसेच भारंग, टाकळा, कपाळफोडी, आघाडा, चुका, कळधी, शेपू, शेवळा या रानभाज्या दिसून येतात.

करटुल्यांसाठी प्रतीक्षाचअमरावती जिल्ह्याच्या बाजारपेठेत अद्यापही करटुल्यांची आवक झालेली नाही. करटुले बाजारात येण्याची प्रतीक्षाच आहे. काही ठिकाणी अल्प प्रमाणातच करटुले विक्रीसाठी येत असल्याचे दिसून येते.

रानभाज्यांचा बाजारभाव कसा?रानभाज्यांचा भाव फडानुसार ठरविला जातो. जिल्ह्यात २० ते ३० रुपये फडाप्रमाणे रानभाज्यांची विक्री केली जाते. ज्या भाज्या दुर्मीळ आहेत. त्यांचे एक फड ५० रुपयांपर्यंत असते.

# कावड यात्रेनिमित्त शहर व जिल्ह्यातील वाहतूकीत बदल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अकोला**

श्रावणातील कावड यात्रेनिमित्त सुरळीत वाहतुकीच्या दृष्टिकोनातून अकोला- अकोट, अकोला- दर्यापूर राज्य महामार्गावरील, तसेच अकोला शहरातील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. त्याबाबतचा आदेश जिल्हा दंडाधिकारी अजित कुंभार यांनी निर्गमित केला.



आदेशानुसार, हा बदल पहिला सोमवार (२८ जुलै), दुसरा सोमवार (४ ऑगस्ट), तिसरा सोमवार (११ ऑगस्ट) या तीन सोमवारी अकोला शहरात प्रत्येक रविवारच्या (२७ जुलै, ३ ऑगस्ट व १० ऑगस्ट) रात्री ८ वा. पासून तिन्ही श्रावण सोमवारी रा. १२ पर्यंत लागू राहील व राज्य मार्गावर आदला दिवस- प्रत्येक रविवारच्या (२७ जुलै, ३ ऑगस्ट व १० ऑगस्ट) दु. २ वा. पासून ते श्रावण सोमवारी सायं. ७ वा. पर्यंत लागू राहील.

चौथ्या सोमवारनिमित्त अकोला शहरातील कावड मार्गावरील वाहतूक दि. १७ ऑगस्ट रोजी रा. ८ पासून दि. १८ ऑगस्ट रोजी रा. १२ पर्यंत, तसेच राज्य मार्गावरील वाहतूक दि. १७ ऑगस्ट रोजी दु. १२ पासून दि. १८ ऑगस्ट रोजी रा. ८ वा. पर्यंत वळविण्यात येणार आहे.

# शेतकऱ्यांना सुखावणार संततधार; पुढचे चार दिवस विदर्भात मध्यम ते मुसळधार पावसाचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

गेल्या दहा-बारा दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाने विदर्भात काही ठिकाणी दमदार हजेरी लावली. वर्धा व ब्रह्मपुरी येथे जोरदार पाऊस बरसला. पुढच्या चार दिवसांत व विशेषतः २४ जुलैपासून विदर्भात विविध ठिकाणी मध्यम ते मुसळधार पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.



अमरावती येथे तुरळक सरी झाल्या. वारंवार ढग दाटून आले; पण, त्यातून जोर-धार बरसली नाही. उलट दिवसभर नागपूरकरांना उकाड्याचा सामना करावा लागला. आर्द्रता ८५ टक्क्यावर होती व ढगांमुळे पारा २ अंशाने घसरत ३२.६ अंशावर आला. त्यामुळे सायंकाळी काहीसा गारवा जाणवायला लागला होता. दरम्यान, मंगळवारी वर्धा येथे ७३ मि.मी. पाऊस झाला, तर ब्रह्मपुरी येथे ४१ मि.मी. पावसाची नोंद झाली. चंद्रपूरला १३ मि.मी. पाऊस झाला. भंडारा, अमरावती, यवतमाळात तुरळक सरी आल्या. त्यामुळे तापमानात अंशतः घट झाली.

बुधवार, २३ जुलैला हलका ते मध्यम पाऊस होईल. त्यानंतर २४ ते २६ जुलैपर्यंत मध्यम ते जोरदार व काही ठिकाणी अतिजोरदार पाऊस होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. नागपूरला २५ रोजी, गोंदियात २४ व २५ रोजी, भंडारा २६, चंद्रपूर २४ तर गडचिरोलीत २४ व २६ रोजी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. पश्चिम विदर्भात मात्र किरकोळ हजेरी लागेल, असा अंदाज आहे.

# महसूल कर्मचाऱ्याना दांडी मारणे होणार अवघड, फेस ॲप - जिओफेन्सिंगने होणार हजेरी - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

फेस प -जिओफेन्सिंग सिस्टीम हे महसूल कर्मचाऱ्यांसाठी अनिवार्य करण्यात येणार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले आहे.यामुळे कर्मचा-यांच्या कार्यालयीन उपस्थितीची नोंद कॅमेरा-स्थानयुग्मित (जीपीएस) द्वारे कार्यालयातच होणार आहे .



केंद्र सरकारने महसूल विभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी फेस प आणि जिओ-फेन्सिंग प्रणाली अनिवार्य केली असल्याने कर्मचाऱ्यांची उपस्थिती आता कार्यालयातूनच नोंदवली जाणार आहे. त्यामुळे, ऑगस्ट महिन्याचा पगार (सप्टेंबरमध्ये मिळणारा) केवळ फेस पवर नोंदणी केलेल्या कर्मचाऱ्यांनाच मिळेल, असे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.याबाबतचा स्पष्ट शासन निर्णय लवकरच काढण्यात येणार असल्याचे स्पष्ट करून, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, प्रशासनात गतिमानता, पारदर्शकता आणि लोकाभिमुखता आणण्यासाठी विविध विभागांचा आढावा घेणे सुरु केले आहे.

ऑगस्ट महिन्याचे वेतन (जे सप्टेंबरमध्ये मिळणार आहे) केवळ त्या कर्मचाऱ्यांना दिले जाईल, ज्यांनी फेस पमध्ये उपस्थिती नोंदवली असेल. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले, की अधिकृत शासन निर्णय लवकरच जारी केला जाईल या उपाययोजनेचा उद्देश अधिक पारदर्शकता, प्रशासनात गतिशीलता, व लोकाभिमुख सेवा वाढविण्याचा आहे.